MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेविसावे / अंक १२ / डिसेंबर २०२२

## संपादकीय

### नोबेल पारितोषिक वितरणाचा महिना

डिसेंबर महिना आला की संपूर्ण जगाला वेड लागते ते नोबेल पारितोषिकाचे. साधारणपणे ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात ही पारितोषिके जाहीर केली जातात. प्रत्यक्ष पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम डिसेंबर महिन्यात होतो. आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही पारितोषिके दिली जातात. आल्फ्रेड हे एक रसायनशास्त्रज्ञ होते. रासायनिक स्फोटके तयार करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांनी डायनामाईट नावाचे एक उपयुक्त आणि प्रभावी असे स्फोटक रसायन बनविण्याचे तंत्र विकसित केले. एकोणिसाव्या शतकात या स्फोटकाला मोठी मागणी होती. म्हणून नोबेलने त्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करून विक्री केली. या व्यवसायात त्यांना खूप पैसा मिळाला. या पैशाचा योग्य विनियोग व्हावा यासाठी नोबेल पारितोषिक देण्याची प्रथा सुरू करण्यात आली.

१८९६ मध्ये आल्फ्रेड नोबेलचा मृत्यू झाला. त्याआधीच त्यांनी आपले मृत्यूपत्र तयार करून घेतले होते. त्यांच्या मृत्यूनंतर पुढच्याच वर्षी ते मृत्यूपत्र उघडून पाहण्यात आले. त्या मृत्यूपत्राची कायदेशीर पडताळणी करण्यात काही काळ गेला. या मृत्यूपत्रानुसार आल्फ्रेड नोबेलने कमावलेल्या अमाप संपत्तीपैकी ३.१ कोटी स्वीडिश क्रोनर नोबेल निधीसाठी ठेवलेला होता. हा निधी सुरक्षित ठेवींमध्ये गुंतवून, मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ६० ते ७० टक्के रकमेचे पाच सारखे भाग करून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, औषधशास्त्र, साहित्य आणि शांतता या पाच विषयांसाठी पारितोषिके देण्याचे आल्फ्रेडने मृत्यूपत्रात सुचविले होते. ही पारितोषिके देण्यासाठी कोणते निकष लावावेत यांचेदेखील विवेचन त्यांनी मृत्यूपत्रामध्ये करून ठेवले होते. त्या विवेचनाच्या आधाराने आवश्यक ते नियम व प्रशासकीय तपशील तयार करण्यात आले. या कामात नोबेल समितीचे विश्वस्त, पारितोषिके देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी व नोबेल यांचे कुटुंबीय या सर्वांनी सहकार्य केले. स्वीडनच्या राजाने या नियमावलीला इ. स. १९०० मध्ये मान्यता दिली. १९०१ पासून पाच नोबेल पारितोषिके द्यायला सुरुवात झाली. यात भर पडली ती अर्थशास्त्रासाठी दिल्या जाणाऱ्या पारितोषिकाची. सेवेरिजस रिक्सबँक या स्वीडिश बँकेने पुढाकार घेऊन १९६८ मध्ये या पुरस्काराची सुरुवात केली.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व अर्थशास्त्र यांतील पारितोषिके देण्याचा अधिकार 'द रॉयल स्वीडिश कॅडमी ऑफ सायन्सेस'कडे, वैद्यकशास्त्राचे पारितोषिक देण्याचा अधिकार 'द रॉयल कॅरोलिन मेडिको-सर्जिकल इन्स्टिटट्यूट'कडे, साहित्याचे पारितोषिक देण्याचा अधिकार 'द स्वीडिश ॲकॅडमी' आणि शांततेसाठी देण्यात येणाऱ्या नॉर्वेच्या संसदेने नेमलेली 'द नॉर्वेजियन नोबेल कमिटी' या चार संस्थांकडे ही पारितोषिके देण्याचे अधिकार आहेत. पारितोषिका-संबंधीचा निर्णय घेण्याचे व तो जाहीर करण्याचे काम या संस्था करतात. पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यासाठी प्रत्येक संस्थेच्या मदतीसाठी तीन ते पाच सदस्यांची समिती असते. या समित्या जरूर वाटल्यास इतर तज्ज्ञांनाही चर्चेसाठी बोलावू शकतात. पारितोषिकासाठी सुचविण्यात आलेल्या उमेदवाराच्या कार्याचे मूल्यमापन करून या समित्या आपला निर्णय देतात, पण हा निर्णय मानणे संस्थांवर बंधनकारक नसते.

आतापर्यंत एकूण ९५४ व्यक्तींना आणि २७ संस्थांना नोबेल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे. यामध्ये काही व्यक्तींना एकाहून जास्त वेळा हे पारितोषिक मिळाल्याचे आढळते. जसे, मादाम क्युरी यांना १९०३ चे भौतिकशास्त्राचे, तर १९११ मध्ये रसायनशास्त्राचे पारितोषिक मिळाले होते. लायनस पॉलिंग यांना देखील रसायनशास्त्र (१९५४) आणि शांततेचे नोबेल पारितोषिक (१९६२) मिळाले होते. नोबेल पारितोषिकांच्या यादीमध्ये भारताची संख्या नगण्य आहे. ब्रिटिश राजवटीत १९१३ मध्ये रवींद्रनाथ टागोर यांना साहित्यासाठी, तर १९३० मध्ये चंद्रशेखर व्यंकट रमन यांना भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. अलीकडच्या काळात मदर टेरेसा, अमर्त्य सेन आणि कैलास सत्यार्थी यांना या पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे. मूळ भारतीय वंशाचे असलेले सुब्रमण्यम चंद्रशेखर, हरगोविंद खुराणा, वेंकटरमण रामकृष्णन आणि अभिजीत बॅनर्जी यांचा देखील नोबेल पारितोषिक विजेत्यात समावेश होतो. यांच्या तोडीचे इतर अनेक शास्त्रज्ञ भारतात होऊन गेले. परंतु नोबेल कमिटीने त्यांचा विचार केला नाही.

नोबेल पारितोषिकासाठी नावे सुचविण्याचे अधिकार काही विशिष्ट संस्थांना देण्यात आले आहेत. याखेरीज ज्यांना नोबेल पारितोषिक मिळाले आहे ते नवीन नावे सुचवू शकतात. नोबेल पारितोषिकाच्या निवडीत बरेच राजकारण चालते असे सांगितले जाते. काहीका असेना; नोबेल पारितोषिक मिळणे हे फारच प्रतिष्ठेचे समजले जाते. नोबेल पारितोषिक वितरणाचा सोहळा स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे १० डिसेंबरला आयोजित करण्यात येतो. दुसऱ्या महायुद्धामुळे १९४० ते १९४२ या काळात असा सोहळा करता आला नाही. नोबेल पारितोषिक स्वीकारल्यानंतर संशोधकाने आपल्या कामावर आधारित व्याख्यान देणे आवश्यक असते. या कार्यक्रमाला अनेक प्रतिष्ठित व्यक्तींना पाचारण केले जाते. विशेष हे की, या वितरण सोहळ्यात शालेय, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी देखील सहभागी होऊ शकतात. त्यासाठी नोबेल कमिटीची आधी परवानगी घ्यावी लागते. विद्या प्रसारक मंडळाच्या शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना एकदा या सोहळ्याला घेऊन जाण्याचा माझा मानस आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा


## वर्ष तेविसावे/अंक १२/डिसेंबर २०२२



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) संतांचं योगदान | रागिणी तरे | ३ |
| ३) रैवतक पर्वताची पदयात्रा | नरेंद्र गोळे | ७ |
| ४) ब्रेव्हहार्टस ऑफ भारत: विक्रम संपत | शेफाली वैद्य | १२ |
| ५) भारताचा ऐतिहासिक वारसा: बारवा | सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे | १४ |
| ६) आपण आणि इंग्लंड | चन्द्रशेखर टिळक | १८ |
| ७) हैदराबाद मुक्तीसंग्राम : विस्मृतीत गेलेले मुस्लीम धर्मांधांनी घेतलेले बळी | राजेश कुलकर्णी | २० |
| ८) मार्कंडा - देव | दिलीप नारायण वंडलकर | २३ |
| ९) परिसर वार्ता | संकलित | २६ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# संतांचं योगदान

*संतांचे योगदान व स्वातंत्र्यसेनानींनी केलेल्या बलिदानाचे महात्म्य या लेखात वर्णिले आहे.- संपादक*

## १) संतांचं योगदान ते १८१८

प्राचीन काळापासून अनेक राजघराण्यांनी भारतात धर्मराज्ये, सुराज्ये केली. सातवाहन, राष्ट्रकूट, कदंब, चालुक्य, गुप्त, मौर्य, पंड्या, शिलाहार, वाकाटक, आभिर, सेंद्रक, कल्चुरी, निकुंभ, चोला, यादव आणि अनेक राज्यांनी राज्य केले.

भारतात समृद्धी, ज्ञान, वैभव, कला, शौर्य, सुबत्ता अगदी ओसंडून वहात होती. रसिकता,विद्वत्ता, नीतिमत्ता, संपन्नता, अध्यात्म कशाचीच कमी नव्हती, अनेक शिल्पे, लेण्या, भव्य मंदिरे, महान ग्रंथ, प्रचलित शौर्यगाथा याची साक्ष देतात. मोठमोठे वाडे, अप्रतिम राजप्रासादे, मंदिरे, रेखीव सुंदर विहिरी, नद्यांचे घाट, शिल्पसौंदर्याने तीळतीळ नटलेले होते.

यादव राज्यात महाराष्ट्र नांदत होता. भागवत धर्माची पताका दौलानं फडकत होती, अनेक संत आपल्या मंगल ओंजळीने महाराष्ट्रात अपार भक्ती ओतत होते, रुजवत होते. किती नावे घ्यावी ! संत जनाई, मुक्ताई, सोहिराई, गोणाई, कान्होपात्रा, चोखोबा, गोरोबा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, बंका महार, जोगा तेली, सेना न्हावी, ज्ञानोबा माउली, एकनाथ महाराज, नामदेव महाराज, तुकाराम महाराज.

'विठ्ठल, विठ्ठल' हे बोल ऐकले, की १८ पगड मराठी मनं उल्हासित होतात. संत परंपरा म्हणजे भारतीय अध्यात्मातील सोनेरी पर्व. हे सर्वसमावेशक साधे सोपे आणि शुद्ध अध्यात्म होते. अगदी सगळ्या जातींची सगळ्या समाजस्तरांतील लेकरे एकत्र येऊन 'विठू माउली'ची भक्ती करत. उच्च-नीचतेची, कर्मठ धर्मकल्पनांची आणि अंधश्रद्धेची मुळं संतांनी उखडून टाकली.

ज्ञानेश्वर माउलींनी संस्कृत भाषेत असलेले अमृतरूपी ज्ञान लोकांना सांगितले.

संतांच्या या वाणीत, उपदेशात समता, एकात्मता आणि प्रेमाचा संदेश होता. पुढे या योगदानाचा खूप मोठा आधार महाराष्ट्राला झाला. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी त्यांच्या 'द रायझ ऑफ मराठा पॉवर' या पुस्तकात मराठा साम्राज्याच्या उदयाची पार्श्वभूमी भरपूर तपशिलात स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते हे जंगलात अचानक लागलेल्या वणव्यासारखे नव्हते; तर महाराष्ट्रात सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक स्तरावर प्रदीर्घ कालावधीत त्यासाठी पार्श्वभूमी तयार होत होती. धार्मिक स्तरावर यात संतांचंही योगदान आहे.

> ''संतकृपा झाली, इमारत फळा आली
> ज्ञानदेवे रचिला पाया, उभरीले देवालया ।
> नामा तयाचा किंकर, तेणे केला हा विस्तार
> जनार्दन एकनाथ, खांब दिला भागवत ।
> तुका झालासे कळस, भजन करा सावकाश
> बहिणा फडकती ध्वजा, निरुपणा केले ओजा''

– संत बहिणाबाई

भारतावर अनेक परचक्रे आली. त्यातलं एक म्हणजे सुलतान अलाउद्दीन खिलजी! त्याने भारतभर

क्रौर्याने धुमाकूळ घातला. दुर्दैवाने यादव राजे पराभूत झाले, महाराष्ट्र पारतंत्र्यात लोटला गेला. खिलजी, बहामनी, पुढे बहामनी राज्याची ५ शक्ले झाली. आदिलशाही, निजामशाही, इमाशाही, बरिदशाही, कुतुबशाही, मग मुघलही आले, हे सुलतान आपापसात भांडत, पण युद्धात मरायचे ते त्यांच्या पदरी असलेल्या मराठा सरदारांनीच. विजयी कोणीही होऊ दे, पराभूत मराठेच व्हायचे. जवळजवळ हे सारेच सुलतान खूप क्रूर आणि अन्यायी होते. त्यांच्या हातून घडले नाही असे क्वचितच कोणतेतरी पातक असेल.

बळजबरीने धर्मांतर, स्त्रियांची अब्रू लुटणे, मंदिरे उद्ध्वस्त करणे, मूर्ती भंग करणे, रयतेवर छळ करून कर गोळा करणे असे अनेक अन्याय रयतेवर होत होते, पण त्यांना वाली कोणीच नव्हता. 'आपला' म्हणावा असा राजा नव्हता. कित्येक शतकं अशीच गेली. आणि मग एका तेजस्वी स्वातंत्र्य सूर्याचा जन्म झाला, छत्रपती शिवाजी महाराज! जिजाऊसूत शिवबा!

जिजाऊ आऊसाहेबांनी शिवरायांना स्वराज्य आणि तेवढंच नव्हे तर सुराज्य स्थापन करण्यास प्रेरणा दिली आणि मराठा साम्राज्य उभे राहिले. पाचही पदशाह्यांच्या छाताडावर स्वराज्य उभे राहिले. घोडदळ, पायदळ, आरमार ! काय नव्हते ? आया-बहिणी सुरक्षित झाल्या. मंदिरांचा जीर्णोद्धार झाला, त्यातील देव निर्धास्त झाले. रयत आणि शेतकरी सुखावले. दिंडीला आणि वारकऱ्यांना शंभूराजांनी धारकऱ्यांची सुरक्षा दिली. मराठ्यांना आव्हान देण्याची कोणाचीही टाप नव्हती.

महाराष्ट्रात कित्येक शतकांनी मांगल्य आणि सुराज्य आलं. सह्याद्री गहिवरला. छत्रपती ताराराणी साहेबांनी स्वराज्य टिकवले. औरंगजेबाला इथेच गाडले.

पुढे शाहू छत्रपतींनी आणि पेशव्यांनी उत्तर हिंदुस्थानांत भगवा फडकवला. पण दुर्दैवाने भारताच्या नशिबी पुन्हा परचक्र होतेच. फक्त या वेळेस यवन नव्हते. होते ते निर्दयी इंग्रज, पोर्तुगीज आणि फ्रेंच.

## २) १८१८ – १९४७

इंग्रज, पोर्तुगीज आणि फ्रेंच व्यापारासाठी आले, स्थिरावले आणि राज्यकर्ते झाले ! त्यांच्यासह मिशनरी आले, त्यांनी क्रूर धर्मांतरं केली, खूप अत्याचार केले. भारताचं आर्थिक शोषण केलं. कापूस, गहू, तांदूळ यासारखी पिके घ्यायला भाग पाडलं, भारतातील गहू जगभर निर्यात होत होता. भारतात अनेकदा दुष्काळ पडला, लोकांची उपासमार झाली. भारतातील कच्चा माल निर्यात करून, तयार उत्पादन इकडच्या बाजारपेठेत विकून नफा मिळवणे आणि पुन्हा तोच गुंतवणे, हे दुष्टचक्र चालवले होते, बळजबरीने अवास्तव कर वसुली होत होती, खूप काळ भारत-भूमी अनेक अन्याय-अत्याचार सहन करत होती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १८५७ च्या उठावाला 'स्वातंत्र्याची पहिली लढाई' असे संबोधले आहे. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध झालेल्या हा लढा देशात ठिकठिकाणी झाला होता. झांसी, ग्वालियर, बिहार, लखनऊ, अमृतसर, पुर, मिरठ, अशी अनेक ठिकाणं उठावाची मुख्य केंद्र होती. या उठावाचे नेतृत्व मंगल पांडे, राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुंवर सिंह यांनी केले. यानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा भारतावरील अंमल संपून, थेट ब्रिटिश अंमल भारतावर प्रस्थापित केला गेला.

१८५७ उठावानंतरसुद्धा ठिकठिकाणी क्रांतीचे उद्रेक होत राहिले. विविध प्रकारे जनता ब्रिटिशांना विरोध करत राहिली. प्लेगचे थैमान ब्रिटिशांनी क्रूरपणे हाताळले म्हणून पुण्यात चाफेकर बंधूंनी रँडची हत्या केली. या घटनेचा स्वा. सावरकरांवरही मोठा प्रभाव होता.

एकीकडे टिळक, मदनलाल, चंद्रशेखर आझाद, बंगालमधील इतर नेते सशस्त्र क्रांतीत गुंतलेले होते. दुसरीकडे गांधीजी सुद्धा सत्याग्रह आणि शांतीपूर्ण निषेध, असहकार आंदोलन इत्यादींचा वापर करून ब्रिटिशांना विरोध करत होते. स्वातंत्र्य लढ्यात शेकडो ज्ञात, अज्ञात,

महान स्त्री-पुरुषाचं योगदान आहे. स्वातंत्र्य यज्ञकुंडात त्यांनी प्राणरूपी समिधा अर्पण केल्या आहेत.

ज्ञानज्योती तेवत्या ठेवा, - जिथे अज्ञान आहे ।
उजळू द्या अंधारलेली वाट, - जी वैरीण आहे ।।

१९ व्या शतकात भारत अनेक सामाजिक समस्यांनी ग्रस्त होता. निरक्षरता, अंधश्रद्धा, कर्मठ धर्मकल्पना, जातीभेद आणि धार्मिक संघर्ष.

स्वातंत्र्यानंतर देशाच्या प्रगतीसाठी अनुकूल सामाजिक वातावरण तयार करणं महत्त्वाचे आहे हे द्रष्ट्या समाजसुधारकांनी ओळखले होते. सावित्रीबाई फुले, जोतिबा फुले, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, कर्वे, शाहू छत्रपती, राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस स्वामी, स्वामी दयानंद सरस्वती या सगळ्यांनी समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेले, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. समाजावर त्यांचे ऋण आहेत. स्वातंत्र्य सेनानी म्हणून त्यांचे योगदान मोलाचे आहे.

### ३) १९४७-२०२२

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अनेक आव्हानं उभी होती, देशात अनेक प्रश्न होते. मिळालेल्या स्वराज्याला सुराज्यात बदलायचे होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारताचे संविधान लिहिले गेले. प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी लोकशाहितील सगळे महत्त्वपूर्ण घटक बांधून ठेवणारा हा भक्कम पाया होता.

मागासलेल्या समाजासाठी, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी, महिला सबलीकरणासाठी, अनेक आयोगांची स्थापना करण्यात आली. वेगवेगळ्या धर्म, जाती, प्रांतातील लोकांची वज्रमूठ वळली गेली की क्रांती घडवून आणणं सहज शक्य होते. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते टिकवायला पुढच्या पिढ्या सगळ्यात क्षेत्रांत सक्षम असणं गरजेचं होतं. यासाठी शिक्षण संस्थांचे आणि समाज सुधारकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

भारतीय लष्कराने शौर्य परंपरेला साजेशी कामगिरी या ७५ वर्षांत केली आहे. मातृभूमीच्या रक्षणार्थ सर्वोच्च बलिदान देण्यास भारतीय जवान कधी मागे-पुढे बघत नाहीत. १९९८ ऑपरेशन शक्ती अंतर्गत डॉ. अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वात ११ ते १३ मे रोजी पोखरण, राजस्थान येथे ५ यशस्वी अणुचाचण्या करण्यात आल्या. भारत अणुबॉम्बधारक देश बनला. सगळ्या शत्रूंना धाक बसला.

पाकिस्तान विरुद्ध ३ युद्धं, पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांचा मुकाबला, काश्मीर प्रश्न, चीनच्या बेकायदेशीर कारवायांना उत्तर देणं, उरी सर्जिकल strike अशी अनेक आव्हानं भारतीय लष्कर रोज अविरतपणे पेलत असते. सैन्यदल, नौदल, वायूदल यांच्या सामर्थ्यामुळे संरक्षण क्षेत्रात भारत हा अत्यंत परिपूर्ण आणि शक्तिशाली देश आहे. या तीनही दलांच्या जीवावर जनता निर्धास्त आहे.

भारताने विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करून दाखवली आहे. इसरो म्हणजेच इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायजेशनने १९ एप्रिल १९७५ रोजी 'आर्यभट्ट' या भारताच्या पहिल्या कृत्रिम उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण केले आणि भारताने अंतराळ युगात पहिले पाऊल टाकले. आर्यभट्ट ते अगदी मंगळ यान, PSLV-C53 पर्यंत अनेक यशस्वी प्रकल्प पूर्ण केले आणि जागतिक पटलावर भारताने मानाचे स्थान मिळवले.

हरित क्रांती योजनेमुळे दुष्काळी पार्श्वभूमीवर अन्न धान्याचे अधिक उत्पन्न घेणे शक्य झाले, संकरिक गहू आणि संकरित डाळींची निर्मिती केली गेली, तसेच श्वेत क्रांती घडवून आणली. तेव्हापासून कृषी क्षेत्रात भारत नेहमीच आघाडीवर राहिला आहे.

या सगळ्या प्रश्नांवर मात करून भारताने सामाजिक न्याय, सुधारणा आणि सशक्तीकरण, आत्मनिर्भरता याला प्राधान्य दिले. स्वतः प्रगतीपथावर असताना भारताने जगालाही खूप काही दिले. 'अर्थ मूलोही धर्मा:' म्हणूनच आर्थिक प्रगती कोणत्याही देशासाठी अत्यंत महत्त्वाची असते.

भारताने आंतरराष्ट्रीय व्यापाराचे उदारीकरण केले. त्यामुळे आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. १९९१ च्या आर्थिक धोरणांमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. भारत खूप मोठी जागतिक बाजारपेठ आहे. भारताचे निर्यात खूप वेगाने increasing in diversity as well as quantity. खासगीकरणाच्या धोरणामुळे सरकारी संस्थांनी खासगी कंपन्यांच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी त्यांच्या सेवेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी प्रशासनातील सुस्तपणा मोठ्या प्रमाणात कमी झाला.

इतिहासात जागतिक व्यापारामुळे भारत जसा आर्थिक दृष्ट्या संपन्न आणि समृद्ध होता, तसाच आधुनिक ते सोबत अनेक सकारात्मक आर्थिक धोरणांमुळे भारत इतिहासात असलेल्या आर्थिक दृष्ट्या असलेल्या आत्मनिर्भर आणि समृद्ध पर्वाकडे वाटचाल करतोय.उद्योग क्षेत्रात अर्थकारण आणि समाजकारण हे दोन्हीही साधून टाटा समूहाने अभूतपूर्व असे योगदान दिले आहे. अलीकडच्या काळात 'Make in India' सारख्या योजनांमुळे सामान्य माणसाने उद्योग क्षेत्रात प्रवेश केल्यामुळे देश संपन्नतेकडे वाटचाल करतोय.

अलीकडच्या काळात भारताचे परराष्ट्र धोरण हे 'आक्रमक व जशास तसे' आहे असे म्हणता येईल. आंतरराष्ट्रीय शत्रूंना लष्करी, आर्थिक आणि मुत्सद्दी या या परराष्ट्र नीतीमुळे भारताचे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे स्थान उंचावले आहे. स्वतःबद्दलच्या आणि इतर जागतिक स्थितींवर भारत सक्रिय सहभाग घेताना दिसून येतो. कला, साहित्य, अध्यात्म ह्या क्षेत्रांत भारताने जगाला खूप काही दिले आहे. भारत हा कवी, विद्वान आणि कलाकारांचा देश आहे हे सर्वमान्य आहे.

क्रीडा क्षेत्रात भारत नेहमीच अग्रेसर राहिला आहे, ऑलिम्पिकस्, कॉमनवेल्थ गेम्स, एशियन गेम्स अशा अनेक आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भारताने अभिमानास्पद कामगिरी केली आहे. १९८३, २०११ चे क्रिकेट विश्वचषक भारताने जिंकले. हॉकी, कुस्ती, बॅडमिंटन, टेनिस, बुद्धिबळ, ॲथलेटिकस् या खेळात हरित क्रांती ते मंगळयान भरारी मातीपासून अंतराळा पर्यंत भारताने प्रगती केली.

कोरोना महामारी ह्या वैश्विक संकटाचाही सामना भारताने नेटाने केला. भारताने निश्चितच खूप काही गमावलं, पण देश पुन्हा उभा राहिला आणि लढत राहिला. लसीकरण सुरू झाल्यापासून ९ महिन्यांत तब्बल १०० कोटी नागरिकांचं लसीकरण पूर्ण झालं.

कोरोना महामारीच्या उत्तरार्धात भारताने जगभरात लस पुरवली. गरजवंत व मित्र राष्ट्रांना मदत केली. प्रतिकूल काळातही मानवतावादी स्वभाववृत्ती सोडली नाही आणि उच्च तात्त्विक अधिष्ठान प्रस्थापित केले. जेव्हा नागरिकांचं मन देशप्रेमाने ओथंबलेले असते तेव्हाच राष्ट्रनिर्माण कार्यात भरभरून योगदान पडते आणि विधायक कार्ये घडतात.

तरुण पिढीत जशी त्यांच्या कर्तव्य आणि क्षमतांची जाण हवी, तशीच त्यांना उत्कृष्टता आणि सर्वोच्चता यांची महत्त्वाकांक्षाही हवीच. भूतकाळाची जाणीव आणि भविष्याची काळजी आणि देशासाठी उच्च स्वप्नं असणं गरजेचं आहे.

शतकानुशतके पारतंत्र्यामुळे झालेल्या जखमा भरून काढून प्रगती पथावर वाटचाल करणे हे कोणत्याही राष्ट्रासाठी खूप मोठं आव्हान आहे, जे भारताने लिलया पेलले, असे म्हणता येईल.

भारत राष्ट्र हे विश्वाचे भूषण आहे.
आचंद्र-सूर्य नांदो; स्वातंत्र्य भारताचे !

**– रागिणी तरे**

•••

तुम्ही जेवढा आनंद दुसऱ्यांना वाटाल, तेवढाच किंबहुना त्याहून जास्त आनंद तुम्हाला प्राप्त होत असतो.

# रैवतक पर्वताची पदयात्रा

*रैवतक (गिरनार) पर्वताची पदयात्रा करताना आलेले अनुभव या लेखात विशद केले आहेत.- संपादक*

गिरीनारायण किंवा गिरनार पर्वतास 'रैवतक' पर्वत असेही म्हणतात. पर्वतावर पाच निरनिराळ्या शिखरांवर, पाच महत्त्वाची तीर्थस्थाने वसलेली आहेत. पर्वताच्या पायथ्यास 'गिरनार तलेटी' म्हणतात. इथे 'दामोदर कुंड' आहे. हे 'अस्थी-विलयकारी' कुंड मानले जाते. इथून सर्वात वरच्या दत्तात्रेय शिखरापर्यंत १०,००० चिरेबंद पायऱ्यांचा सुघटित सोपान आहे. येथील एकूण यात्रेकरूंपैकी केवळ १५% यात्रेकरूच वरपर्यंत जात असतात (१).



पाच शिखरांच्या (टुंक, महत्त्वाचे तीर्थक्षेत्र) आसपासच्या परिसरात विखुरलेल्या ८६६ हिंदू व जैन मंदिरांमुळे रैवतक (गिरनार) पर्वत हा शतकानुशतके पश्चिम भारतातील यात्रेकरूंचे महत्त्वाचे तीर्थस्थान राहिलेला आहे. गुजरातमधील तो सर्वोच्च उंचीचा पर्वत आहे. पर्वताचा 'गिरनार तलेटी' हा तळ, जुनागढ शहराच्या केंद्रभागापासून सुमारे ४ किलोमीटर पूर्वेस आहे. यात्रेच्या उद्देशाने पर्वतारोहणास पहाटेसच सुरुवात करणे चांगले समजतात. यात्रेचे प्रत्येक पाऊल संपूर्ण तीर्थाटनाचा उद्देश कायम ठेवूनच उचलले जाते.

सोनरेखा नदीकिनारी वसलेल्या राधा-दामोदर आणि बलदेव-रेवती कुंडांपासून दगडी सोपानाची सुरुवात होते. इसवीसनाच्या १५ व्या शतकात इथेच संत नरसी मेहता स्नान करत असत. त्यांनी त्यांच्या 'प्रभातीय' रचना इथेच तयार केल्या होत्या. पाच शिखरांपासून जाणारा हा सोपान मग तुम्हाला हिंदू धर्माच्या अनेक पंथांच्या मंदिरांप्रत घेऊन जातो. सुरुवातीच्या 'भवनाथ मंदिरात' शिवरात्र साजरी करण्यासाठी 'नागा साधू' येत असतात. ४,००० पायऱ्यांवरील विस्तीर्ण पठारावर जैन मंदिरांचे पहिले शिखर आहे. ही मंदिरे इसवीसनाच्या १२ ते १६ शतकांदरम्यान निर्मिली गेली होती. ७०० वर्षे तपश्चर्या केल्यानंतर, जैनांचे २२ वे तीर्थंकर 'नेमिनाथ' इथेच निवर्तले होते. पुढे आणखी ८०० पायऱ्यानंतर असलेल्या अंबाजी मंदिरात हिंदू, जैन आणि नवपरिणत वधू-वर सुखी जीवनाचा आशीर्वाद घेण्याकरता येत असतात. नंतरच्या पायऱ्या दमछाक करणाऱ्या आहेत. मात्र शिखरांवरून दिसणाऱ्या विहंगम प्रेक्षणीय दृश्यांकरता त्याही सुसह्य भासतात. शिखरांच्या उंचीवरील जोराचे थंडगार वारे परिश्रमही हलके करत असतात. गोरक्षनाथ शिखरापासून दगडी सोपान १,००० पायऱ्या उतरत जुळ्या कमानीपर्यंत जातो. त्यानंतर उतार चढावाच्या ३,००० पायऱ्या आपल्याला दत्तपादुकाशिखराप्रत घेऊन जातात. सोबतच खाली उतरणारा एक जिना २१० पायऱ्या उतरून कमंडलकुंडाप्रत घेऊन जातो. रेणुकाशिखर, अनसूया शिखर आणि कालिकाशिखरापर्यंतही वाटा आहेत. कालिकाशिखरावर अघोरपंथी चिताभस्माचे लेपन करून घेत असतात.

सोबत पुरेसे पाणी घेऊन पहाटेसच पदयात्रा सुरू करणे हा पर्याय तर आहेच. शिवाय पुरा मेहनताना घेऊन या शिखरांवर घेऊन जाणारे डोलीवालेही उपलब्ध

आहेत. आपापल्या देवांचा आशीर्वाद घेऊ पाहणारे वृद्ध, अपंग लोक त्यांचीच मदत घेतात.

**डोलीवाल्यांचे दरपत्रक**

एकीकडे, भारतभरच्या पदभ्रमरांना आणि गिर्यारोहकांनाही हे स्थान त्यामुळेच सदोदित आकर्षित करत राहिले. तर दुसरीकडे, धड चालताही येत नाही अशा वृद्धांना आणि अपंगांनाही तेथवर जाण्याचे कायमच अपार आकर्षण राहिले. आयुष्यभर स्वकष्टाने अर्जिलेले धन त्यावर खर्च करण्यास ते तयार असतात. त्यामुळे 'डोली'च्या संकल्पनेचाही सर्वाधिक विकास येथेच झाला. १०,००० पायऱ्यांच्या सोपानावर डोलीने वरपर्यंत नेऊन सुखरूप परत आणू शकतील अशा सशक्त, समर्थ भोई लोकांची परंपराच येथे निर्माण झाली. हा व्यवसाय इथल्याएवढा विकसित झालेला क्वचितच आढळून येईल. त्यांची साधने म्हणजे डोलीचा नवारीने विणलेला २ x २ फुटांचा पाट, दोऱ्या व त्यांच्या गाठी, आधाराचा वरचा बांबू/ वासा/ खांब, हाती धरावयाच्या आणि विश्रामांदरम्यान मूळ डोलखांबास आधार म्हणून जमिनीवर रोवल्या जाणाऱ्या काठ्या यांच्या रंगरूपाचाही अपरिमित विकास झाला. ती सारीच साधने सुटसुटीत, सशक्त आणि वापरास सोपी झाली. सशक्त आणि डोलीवाहन कुशल युवकांना या व्यवसायात कायमच सहज उपजीविका लाभत आली. त्यामुळे समर्थ, कुशल डोलीवाहकांची फौज येथे कायमच तैनात राहिली. उपलब्ध राहिली. पूर्वघोषित, सुनिश्चित आणि वाजवी दरांमुळे डोलीने जाणारे आश्वस्त झाले. सशक्त आणि समर्थ भोई सतत उपलब्ध राहत असल्याने डोलीचा प्रवास, कल्पनाही करता येणार नाही एवढा स्वस्त, सुरक्षित आणि शाश्वत झाला. तलेटीशी डोलीवाल्यांच्या वाहून नेण्याच्या वजनावारी दिलेल्या दरपत्रकाचा फलकही आहे. डोली कुठून कुठवर घेतली यानेही दर बदलतात. मात्र यातील पारदर्शिकता वाखाणण्यासारखीच आहे.



अंतरा अंतरांवर भोई लोक विश्रांतीकरता थांबतात. त्यावेळी डोलीचा भार काठ्यांवर लादून काठ्यांना सरळ राखण्यापुरताच आधार ते देत असतात. त्यामुळे विश्रांतीकाळात त्यांना डोलीचा भार सोसावा लागत नाही. तो काठ्याद्वारे जमिनीवर टाकला जातो. विश्रांती झाल्यावर भोई डोलखांब उचलून खांद्यांवर घेतात, काठी हाती धरतात आणि मार्ग आक्रमू लागतात. मात्र आता रज्जूमार्ग झाल्याने परिस्थिती आमूलाग्र बदललेली आहे.

**रज्जूमार्ग**

रज्जूमार्गाचे खालचे स्थानक 'उडनखटोला', सुदर्शन तलावापाशी, भवनाथ तलेटी, जुनागढ येथे आहे. या रज्जूमार्गाची लांबी भारतात सर्वात जास्त म्हणजे २,१२६.४ मीटर इतकी आहे. तो तळापासून ९०० मीटर उंचीवरील अंबामाता मंदिरापर्यंत पोहोचवत असतो. मार्गावर अद्ययावत असे ८ माणसे क्षमतेचे एकूण २५ रज्जूकक्ष वर-खाली अशी प्रवाशांची ने-आण करत असतात. दररोज ते एकूण ८,००० माणसांची ने-आण करतात. रज्जूमार्ग वर्षभर सतत सकाळी ७:०० वाजल्यापासून तर संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत सुरू असतो. जुलैमध्ये त्यास वार्षिक दुरुस्तीकरता काही दिवस कार्यविराम दिला जात असतो. तळापासून वरपर्यंत जायला ७.४३ मिनिटे लागतात. तळापासूनच्या एकूण १०,००० पायऱ्यांपैकी ५,००० पायऱ्यापर्यंत म्हणजे अंबामाता मंदिरापर्यंत तो आपल्याला घेऊन जात असतो. तिकीट रु.७००/- आहे. सवलतीच्या तिकिटाचा दर रु.४००/- आहे. १९८३ साली प्रस्तावित झालेल्या

आपण अशा ठिकाणी पोहोचलो पाहिजे, जिथे आपण पैशासाठी काम न करता आपल्या आनंदासाठी केलं पाहिजे.

या रज्जूमार्गाचे, २४ ऑक्टोंबर २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते उद्‌घाटन झाले.

**सोपानाची निर्मिती**

जुनागढ राज्याचे दिवाण राय बहादूर हरिदास विहारीदास देसाई (१८४०-१८९५) यांच्या नेतृत्वाखालील समितीने 'गिरनार लॉटरी' काढली आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून गिरनार तलेटीपासून दत्तपादुका-शिखरापर्यंत १०,००० पायऱ्यांचा सोपान तयार केलेला आहे. १८८३ साली ते दिवाण झाले होते. सोपानाच्या सुरुवातीस 'चढावाव हनुमानाचे मंदिर' लागते. इथूनच त्यास वंदन करून चढाईस सुरुवात केली जाते. इथून पुढील उल्लेखनीय स्थाने, त्यांची मीटरमधील उंची आणि तेथवर चढाव्या / उतराव्या लागणाऱ्या अनुमानित पायऱ्या पुढील कोष्टकात दिलेल्या आहेत (२).

| अक्र | टुंक | तीर्थस्थान | उंची मीटर | उंची फूट | पायऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| ० | | भवनाथ तलेटी | - | - | ० |
| १ | | रज्जूमार्ग पायथा | १६८ | ५५१ | - |
| २ | | सेसावन | - | - | ३,१०० |
| ३ | १ | नेमिनाथ मंदिर | ९४५ | ३,१०० | ३,८०० |
| ४ | २ | जटाशंकर मंदिर | - | - | ४,१०० |
| ५ | | रज्जूमार्ग माथा | १,०६६ | ३,४९८ | - |
| ६ | ३ | अंबा माता मंदिर | १,०८० | ३,५३० | ४,८४० |
| ७ | ४ | गोरक्षनाथ मंदिर | १,११७ | ३,६६६ | ५,२८० |
| ८ | | जुळी कमान | - | - | ६,१३० |
| ९ | ५ | दत्तपादुका मंदिर | १,००४ | ३,२९५ | ९,९९९ |
| १० | | कमंडल कुंड | ९५४ | ३,१३१ | ६,३४० |

गिरनार सोपानाची महती त्यावरील एका संकेत-स्थळावर पुढीलप्रमाणे वर्णिली आहे (३). एवढा प्रचंड आणि लांबलचक दगडी सोपान जगात दुसरा नाही. सबंध गुजरात राज्यातील सर्वोच्च शिखर असलेल्या, समुद्रसपाटीपासून १,११७ मीटर (३,६६६ फूट) उंच असलेल्या, गोरक्षनाथ शिखराप्रत नेणाऱ्या या सोपानावर पाच शिखरे (टुंक, महत्त्वाची तीर्थक्षेत्रे) वसलेली आहेत असे मानले जाते. नेमिनाथ मंदिर, जटाशंकर मंदिर, अंबाजी मंदिर, गोरक्षनाथ मंदिर आणि दत्तपादुका मंदिर ही ती तीर्थस्थाने आहेत. इसवीसनाच्या तेराव्या शतकापासून जैन मंदिरांची निर्मिती आणि त्यांच्याप्रतचे आवागमन इथे सुरू आहे. यथावकाश तीर्थांची संख्या, पसारा आणि सोपानाची सर्वव्यापकता वाढतच गेली. दत्तात्रेयांनी दत्तपादुकाशिखरावर १२,००० वर्षे तपश्चर्या केली, अजूनही ते तेथे तप करत असतात, योगशास्त्राचा विकास आणि अभ्यास यातून घडत गेला, नवनाथांपैकी गोरक्षनाथांचा येथे निवास राहिला, इत्यादी धारणांमुळे योगाभ्यासाची परंपराच येथे निर्माण झाली. नितांत सुंदर, भव्य, दिव्य जैन मंदिरांची निर्मिती येथे सर्वकाळ होतच राहिली. त्यांना भेट देणाऱ्यांची संख्याही वर्धमान राहिली. त्यामुळे कलाकारी, पर्यटन, अनुषंगिक व्यवसाय आणि राजाश्रय यांचेही हे जणुकाही माहेरघरच झाले. या साऱ्यांचे पर्यवसान होऊन परिसरातील सर्वोच्च शिखराप्रत सर्वसामान्य माणसालाही सहज चालत जाता यावे, उंचच उंच सुळक्यांच्या निसर्गवैभवाचा आस्वाद घेता यावा याकरता जगातील एकमेवाद्वितीय, सर्वात प्रदीर्घ अशा या पत्थरी सोपानाची निर्मिती झाली. सोपानावरील पुढील प्रकारच्या फलकांतून त्याची माहितीही दिली गेलेली आहे.




हा फोटो श्री. अमोघ डोंगरे यांनी भवनाथ तलेटीपासून चढाई सुरू केल्यावर, ४ डिसेंबर २०२२ रोजी पहाटे ०१:०७ वाजताचे सुमारास कुठेतरी काढलेला आहे. हे स्थान नेमिनाथ मंदिराच्या ९०० पायऱ्या खालच्या बाजूला

आहे अशी माहितीही यावरूनच कळते. यावरून हे स्थान जैनांचे ‘सेसावन’ तीर्थक्षेत्र असावे असे अनुमान करता येते.

धार्मिक, पर्यटनाचे दृष्टीने, पदभ्रमणाचे दृष्टीने आणि विविध कला, उद्यमांचे माहेरघर म्हणून लोक रैवतकाची वाट धरत असताना मी मात्र जगभरातील महदाश्चर्य असलेल्या पत्थरी सोपानाच्या अनिवार आकर्षणाने तिथे जाण्याचे ईप्सित धरून होतो. ‘चरन्वै मधु विन्दन्ति’या फुलपाखरी वृत्तीनेमला पुन्हा एकदा पर्वत कड्यांच्या निसर्गवैभवाकडे ओढून आणले होते. या वेळेला ईप्सित रैवतक पर्वतशिखराचे होते. यावर्षी संधी मिळताच मी, पहिल्या ५,००० पायऱ्यांसाठी रज्जूमार्गाचा वापर करून, या सोपानाच्या वरच्या ५,००० पायऱ्या चढण्याचे आणि उतरण्याचे उद्दिष्ट माझ्याकरता ठेवले होते. ३ डिसेंबर २०२२ रोजी ते साध्य झाले. २७ जणांच्या मोठ्या गटाचा मी हिस्सा होतो. सारेच्यासारेजण यशस्विरीत्या आपापल्या मार्गांनी गिरनारचे गुरुशिखर सर करून आले! ज्या १३ जणांनी रज्जूमार्गाने जाऊन येऊन ५,००० पायऱ्या चढल्या-उतरल्या त्यांत मी एक होतो. अंबाजीपासून सुमारे ०९.३० वाजता चढाईस सुरुवात केल्यावर, दत्तपादुकाशिखर आम्ही सुमारे दीड तासांतच गाठले होते. मग जुळ्या कमानीपासून खाली उतरून कमंडलकुंडावर प्रसाद घेऊन १२३० चे सुमारास रज्जुमार्गाच्या पायथ्याशीही पोहोचलो होतो. शिखरांवरील शीतल प्रसन्न वारे, दूरवरचा प्रदेश नजरेत आणणारी उंची आणि आकर्षक सोपानाची सोबत अनुभवत माझी रैवतकाची पदयात्रा सफल संपूर्ण झाली.



उडनखटोल्यातून भवनाथ तलेटीचे दर्शन असे घडते.



नेमिनाथ मंदिरसमूहाचे नयनमनोहर दृश्य दिसते.




मग गोरखशिखर, दत्तशिखर आणि रेणुकाशिखराचे विहंगम दृश्य पुढे येते. दुसरा फोटो, पुढे दत्तशिखराच्या दिशेने गोरखशिखर उतरतांना पूर्वेला तोंड करून काढलेला आहे. यात, दत्तशिखर सुळक्याच्या तीव्र उताराच्या सोंडाही नजरेत भरत आहेत. गोरखशिखर पार करून आपण खाली उतरू लागतो तेव्हा मग एक जुळी कमान समोर येते! डावीकडची कमान दत्तपादुकाशिखराप्रत नेते, तर उजवीकडची कमान कमंडलकुंडाकडे.




पुढील क्षणचित्रे तेथील परिस्थितीची पुरेशी कल्पना देतील.



यशापर्यंत पोहोचण्यासाठी शॉर्टकट कधीच नसतो!

दत्तपादुका मंदिरात 'फोटो काढायला' सक्त मनाई आहे. त्यामुळे तेथील फोटो काढता आले नाहीत.

परतताना गोरखशिखराजवळून अंबामाता मंदिर सुरेख दिसते. थोडेसे उतरून मग आपण रज्जूमार्गाच्या वरच्या स्थानकापाशी पोहोचतो. इथून गोरखशिखर, त्याच्यामागे दत्तपादुकाशिखर आणि सर्वात मागे रेणुकाशिखर अशी शिखरे ओळीने दिसू लागतात.







उडनखटोल्यातून परतताना दिसणारे भवनाथ तलेटीचे दृश्य मग सारीच चढाई पुन्हा आठवण्यास कारण ठरते. रैवतकाची पदयात्रा तर सफल संपूर्ण झालेली असते. निरोपाची लगबग सुरू असते. मात्र का कोणास ठाऊक, असे वाटत राहते की, हे सारे 'केवळ पुनरागमनाय'च आहे. आपण पुन्हा इथे नक्की येणार! तथास्तु!!

**रैवतकाची पदयात्रा**

आहे रैवतकात थोर इथला सोपान तो पत्थरी
नेई दत्तगुरुपदास क्रमता वाटा इथे पायीही ।
नाही झेपत ज्या प्रवास, करते डोली तयाचे भले
भोई नेत तयास दूर अवघा लंघून सोपानही ।।

यात्रा देत सुखे, प्रवास करता दावी स्थळे कौतुके
वारे वाहत गारगार करते साऱ्यांस आनंदित ।
होते दर्शन, भाव येत जुळुनी, वाटे खरे सार्थक
आलो येथवरी, कृपाच सगळी, दत्ताची ही केवळ।।

**संदर्भ**


१. गिरनार उडनखटोला https://udankhatola. com/news-detail/all-about-the-girnar-hill

२. गिरनार महात्म्य, चंपकलाल ए. दोशी, बजरंग प्रेस, १४-०६-२०१४, रु.३०/-

३. गिरनार सोपान https://junagadhgirnar. com/stairs-at-girnar/

४. रैवतक पर्वताची पदयात्रा https://nvgole. blogspot.com/2022/12/blog-postš11.html


**- नरेंद्र गोळे**


१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी, टिळकपथ
छेदगल्ली, टिळकनगर, डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


•••


दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# ब्रेव्हहार्टस ऑफ भारत : विक्रम संपत

*दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी ज्येष्ठ युवा इतिहासकार विक्रम संपत यांनी लिहिलेल्या 'ब्रेव्हहार्टस ऑफ भारत' या पुस्तकाचे प्रकाशन 'चाणक्य मंडल परिवार' पुणे येथे पार पडले. या सोहळ्याचा लेखाजोखा ज्येष्ठ लेखिका शेफाली वैद्य यांनी प्रस्तुत लेखात मांडला आहे - संपादक*

दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी चाणक्य मंडल परिवारमध्ये झालेला विक्रम संपत बरोबरच्या प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम सुंदर रंगला. मुळात विक्रमचे वैशिष्ट्य हे आहे की, तो अत्यंत शांतपणे आणि हसतमुखाने अत्यंत कटू सत्य बोलू शकतो आणि तो बोलतो ती प्रत्येक गोष्ट 'पुराव्यानिशी शाबीत' केलेली असल्यामुळे त्याच्या बोलण्यात कुणालाच काही खोट काढता येत नाही. त्याच्या 'ब्रेव्हहार्टस ऑफ भारत' ह्या नव्या पुस्तकावर संवाद होता. ज्यांच्या कर्तृत्वाला मार्क्सिस्ट इतिहासकारांनी न्याय दिला नाही अशा भारतीय इतिहासातल्या १५ व्यक्ती, (आठ पुरुष आणि ७ स्त्रिया) ज्यांनी आपल्या मायभूमीसाठी बलाढ्य शत्रूशी झुंज दिली, मग ते क्रूर इस्लामी आक्रमक असोत, किंवा पोर्तुगीज, डच, इंग्रज ह्यासारखे गोरे वसाहतवादी असोत.

विक्रमच्या बोलण्यातून तीन महत्त्वाचे मुद्दे अधीरेखित झाले. पहिला मुद्दा म्हणजे, स्वातंत्र्यनंतरच्या भारतीय इतिहासकारांनी भारतीय इतिहास हा फक्त दिल्ली केंद्रित करून ठेवला. दक्षिणेतल्या चोळ, पल्लव, चालुक्य, होयसळ, पांड्य, विजयनगर आदी राजवटींचा इतिहास जाणूनबुजून दुर्लक्षित ठेवला गेला आणि दिल्ली सल्तनती, मुघल, खिलजी राजवंश ह्या मुसलमानी राजवटींवर नको इतके लक्ष केंद्रित केले गेले. साहजिकच प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याला मुगल वंशावळीची माहिती असते, पण तीन चोळ सम्राटांची नावे सांगा म्हटलं तर ते गडबडतात. कारण त्यांच्या इतिहासावरच्या क्रमिक पुस्तकात त्यांनी ह्या विषयावर काही वाचलेलंच नसतं.

विक्रमचा दुसरा मुद्दा हा होता की, आपण आजवर फक्त भारतीयांच्या पराजयाच्याच कहाण्या वाचत आलो. इतिहासाच्या पुस्तकातून मग तो मुहम्मद बिन कासीमचा सिंध वरचा विजय असो किंवा तारायणच्या युद्धात घोरच्या मुहम्म्मदाने पृथ्वीराज चौहानचा केलेला पराभव असो किंवा प्लासीचे युद्ध असो. पण ह्याच मुहम्मद घोरीशी लढून त्याचा पराभव करणारी गोव्याची कदंब राजकन्या आणि गुजरातची सोळंकी राणी नायकीदेवीचे नाव आपण कधी ऐकलेले नसते.

आपला वैभवसंपन्न देश परदेशी आक्रमकांना बाराशे वर्षे तोंड देत होता. लढाऊ वृत्ती न सोडता सतत संघर्ष करीत होता. म्हणूनच आठवे शतक ते बारावे शतक ही चारशे वर्षे इस्लामी आक्रमकांना आपली सत्ता एकहाती भारतात स्थापन करता आली नाही. १२ व्या १३ व्या शतकापासून दिल्लीत इस्लामी सत्ता आली खरी; पण जंग जंग पछाडूनही इस्लामी आक्रमकांना पूर्ण भारताचे इस्लामीकरण करता आले नाही. इथल्या हिंदू राजांकडून त्यांना सतत प्रतिकार होत राहिला.

दुर्दैवाने भारत स्वतंत्र झाल्यानंतर ज्या लोकांच्या हाती सत्ता गेली त्यांनी पोसलेल्या इतिहासकारांनी ह्या प्रतिकाराच्या उज्ज्वल गाथा आपल्यापुढे कधी आणल्याच नाहीत. त्यांनी आपल्याला सांगितल्या फक्त आपल्या पराभवाच्या लाजिरवाण्या कथा, त्यादेखील इस्लामी आक्रमकांचे क्रौर्य आणि त्यांच्या धर्मांधतेवर पांघरूण घालून. अभिजीत जोग ह्यांनी आपल्या 'असत्यमेव जयते' ह्या पुस्तकातही नेमके हेच विस्ताराने लिहिले आहे.

विक्रमचा तिसरा मुद्दा हा होता की, आपल्याला असे सांगितले जाते की, हिंदूना इतिहास-लेखन कधीच जमले नाही. पण हे खरे नाही. आधुनिक इतिहासकार जसे टाइमलाईनवर एकाच रेषेने जाणारा इतिहास लिहितात तसे इतिहास-लेखन कदाचित भारतात झाले नसले, तरी आपला स्वतःचा असा इतिहास लेखनाचा भारतीय दृष्टीकोन होता. राजतरंगिणी ह्या ग्रंथाचा लेखक आणि प्राचीन भारतीय इतिहासकार कल्हण ह्याच्या एका श्लोकाचा आधार घेत विक्रमने विषद केले की, आपला इतिहास हा कथा स्वरूपात सांगितला जायचा, ज्याचा उद्देश्य होता पुढील पिढ्यांना मागच्या पिढ्यांच्या जीवनातून चार पुरुषार्थ सिद्ध करायला प्रेरणा मिळावी. ह्या दृष्टिकोनाचे आपल्याकडे फार अभ्यासपूर्ण विवेचन झालेले नाही ह्याकडेही त्याने लक्ष वेधले.

कार्यक्रम अत्यंत नेटका आणि आटोपशीर झाला. चाणक्य मंडल परिवाराच्या शिस्तबद्ध नियोजनाबद्दल ह्याआधी ऐकून होते, काल प्रत्यक्ष अनुभव घेतला. अविनाश धर्माधिकारी सरांच्या तालमीत तयार झालेले तरुण विद्यार्थी अत्यंत उत्साहाने कार्यक्रमात वावरत होते. हॉल खचाखच भरलेला होता आणि बहुतेक सगळे श्रोते तरुण होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला आणि शेवटी प्रार्थना झाली. अत्यंत धीर-गंभीर स्वरात सर्वांनी एकत्र केलेला मंत्रोच्चार अंगावर रोमांच आणत होता. शेवटची प्रार्थना स्वतः धर्माधिकारी सरांनी रचलेली. अत्यंत अर्थवाही शब्द आणि सर्वांनी मिळून एकत्र म्हणता येईल अशी सोपी, तरीही गोड चाल. त्यामुळे कार्यक्रम संपला तरी प्रार्थनेचे शब्द दीर्घ काळ मनात रेंगाळत राहिले होते.

नव्या वैभवाचीच स्वप्ने सजावी,
मनी हास्य लेवून मुक्ती जगावी,
हवी फक्त उन्मुक्त निर्माण शक्ती,
नवी धेय आसक्त प्रल्हाद भक्ती..

हे त्या प्रार्थनेचे पहिले कडवे, त्यातले शेवटचे कडवे अजूनही माझ्या मनात घर करून आहे,

जरी एक अश्रू पुसायास आला,
तरी जन्म काहीच कामास आला,
जरी अश्रू विस्फोट होऊन सजला,
तरी मुक्त ज्वालामुखी जन्म झाला

हे ते शब्द. ह्या कडव्यातल्या भावनेत आणि सावरकरांच्या, ' जरि उद्धरणी व्यय न तिच्या हो साचा, हा व्यर्थ भार विद्येचा' ह्या भावनेत तसं पाहिलं तर फार साम्य आहे. धर्माधिकारी सर काय, चाणक्य मंडलची परीक्षेत यशस्वी होऊन प्रशासकीय सेवेत रुजू झालेली मुले काय, भारताच्या इतिहासातील दुर्लक्षित घटनांवर, व्यक्तींवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकणारा विक्रम संपत काय, समाज माध्यमांमधून, लेखनातून सातत्याने व्यक्त होणारी मी स्वत: काय, आमच्या परीने आम्ही सगळेच जण हेच तर करायचा प्रयत्न करतोय!

**– शेफाली वैद्य**
पुणे

•••

आयुष्यात आपण कितीवेळा हरलो आहे, काही फरक पडत नाही;
कारण तुमचा जन्म जिंकण्यासाठी झाला आहे.

# भारताचा ऐतिहासिक वारसा : बारवा

*भारताचा प्राचीन वारसा असलेल्या बारवांची माहिती देणारा लेख - संपादक*

पाणी म्हणजे जीवन. पृथ्वीवर जीवसृष्टी अस्तित्वात असण्याची दोन मुख्य कारणे म्हणजे या ग्रहावर असणारे वातावरण (हवा) व पाणी ही होत. जर वातावरण व पाणी नसेल तर आपण जीवसृष्टीचा विचारच करू शकत नाही. त्यामुळे आपण मानवी संस्कृतीचा प्राचीन काळापासूनचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, मानवाने पाणवठे पाहूनच त्यांच्या आसपास वस्त्या केलेल्या आहेत. मग हे पाणवठे तळी, झरे वा नदीच्या स्वरूपात असतील. आपल्या असे लक्षात येते की, प्राचीन इजिप्तची संस्कृती, मेसोपोटेमियाची संस्कृती, सिंधू संस्कृती व वैदिक संस्कृती या वा प्राचीन काळातील इतर अनेक संस्कृती व सभ्यता या प्रामुख्याने नाईल, टायग्रिस, सिंधू, गंगा व इतर नद्यांच्या काठावरच उदयास आल्या व विकसित झाल्या. याचे कारण या नद्या म्हणजे पाण्याच्या मुख्य स्रोत होत्या. मानवाला आपल्या रोजनिशीतल्या जीवनात पाणी लागत असते. हे पाणी पिण्यासाठी, अन्न शिजविण्यासाठी, स्नान करण्यासाठी, पाळीव प्राण्यांना स्वच्छ करण्यासाठी व सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतीसाठी लागत असते. त्यामुळेच प्राचीन काळापासून मानव नेहमीच वर नमूद केल्याप्रमाणे पाणवठ्यांच्या नजीक वस्ती करून राहू लागला. एवढेच काय, आपण जगातील विविध देशांमधील अनेक महत्त्वाची शहरे पाहिली तर ती कुठल्या ना कुठल्या नदीच्या काठावर असलेली आढळतात. असो. आपला मुद्दा असा आहे की, पाणी अथवा जल हे मानवी जीवनासाठी व एकंदरीतच पृथ्वीवरील सर्व प्राणीमात्रांसाठी व वृक्षवल्लींसाठी नितांत गरजेचे आहे. पाण्याशिवाय आपण जगूच शकत नाही. त्यामुळे निसर्गाने जमिनीपेक्षा पाण्याचे प्रमाण (नद्या, तळी, हिमशिखरे, भूगर्भातील जल, सागर व महासागर), जास्त ठेवलेले आहे की काय असे वाटते. मानवी शरीरात देखील साधारणपणे साठ ते सत्तर टक्के पाणी असते.

पाण्याचा उपयोग जगण्यासाठी होतोच; मात्र आपण हिंदू धर्माचा विचार केला असता असे निदर्शनास येते की, या धर्मात पाण्याला धार्मिक विधींमध्ये फार महत्त्व आहे. हिंदू धर्मात जलाला शुद्धतेचे प्रतीक मानलेले आहे. गंगा, सरस्वती, यमुना, क्षिप्रा, शरयु आदी नद्यांचे जल फार पवित्र मानले गेले आहे. त्यामुळेच राजाला त्याचा राज्याभिषेक करताना अशा नद्यांच्या पवित्र जलाने अभिषेक केला जात असे. तसेच, शिवमंदिरांमध्ये महादेवाच्या पिंडीवर पाण्याने भरलेला कलश असतो व त्यातील जल संततधारेने शिवलिंगावर पडत असते. त्यामुळे प्राचीनकाळापासून शिवमंदिरांचे निर्माण जलाशयांच्या बाजूला झालेले आढळते. अथवा जेथे शिवमंदिरांचे निर्माण करण्याचे ठरविले जाते तेथे जलाशय निर्माण केला जातो; जेणेकरून तेथील जल शिवलिंगाच्या अभिषेकासाठी वापरले जावे.

धार्मिकदृष्ट्या जलाशयांना भारतात अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु अगोदर नमूद केल्याप्रमाणे पाणी हे जगण्यासाठी अत्यावश्यक आहे. मानवाने नदी, झरा, तळी यांच्या काठी वस्त्या केल्या, गावं वसविली व कालांतराने या गावांचे रूपांतर मोठ्या शहरांमध्ये देखील झाले. परंतु जेथे असे पाण्याचे नैसर्गिकरीत्या तयार

झालेले स्रोत नसतील तेथे मानवाने कृत्रिमरित्या पाण्याचे स्रोत निर्माण केलेले निदर्शनास येते. यात तळ्यांचा व विहिरींचा समावेश होतो. अगदी प्राचीनकाळापासून मानवाने तळी व विहिरी खणलेल्या असल्याचे आपल्या लक्षात येते.

आपण येथे प्रामुख्याने विहिरींची व एका विशिष्ट प्रकारच्या विहिरींची, ज्यांना बारवा वा पुष्करणी असे म्हटले जाते त्यांचा विचार करणार आहोत. विहिरींविषयी बोलावयाचे झाल्यास आपल्या असे लक्षात येते की, अगदी सिंधू संस्कृतीच्या काळापासून विहिरी खणण्या-विषयीचे ज्ञान आपल्या पूर्वजांना होते. आपणास भारत तसेच पाकिस्तानातील विविध भागांतून सिंधू संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. सिंधू संस्कृतीतील शहरांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे येथे लोकांनी विहिरी खणलेल्या होत्या व त्या विटांनी बांधून घेतलेल्या होत्या. आपण बारव वा पुष्करणींचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, या बारवांनी अनेकदा भूकंपाचे धक्के देखील सहन करून त्या टिकून राहिलेल्या आहेत. तसेच बारवांची खोली साधारण विहिरींच्या खोलीपेक्षा जास्त असल्यामुळे सहसा यांचे पाणी कमी होत नाही वा होत नसे.

आपण इतिहासात पाहिले तर असे जाणवते की, साधारणतः इसवीसनाच्या तिसऱ्या शतकापासून भारतामध्ये व प्रामुख्याने पश्चिम भारतात म्हणजेच आजच्या गुजरातमध्ये बारव बांधण्यात येत होत्या. विहिरी ह्या गावातील पाण्याची गरज भागविण्याचे एक मुख्य स्रोत आहेत. त्यामुळेच गावागावात आपल्याला विहिरी आढळतात. किंबहुना असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, भारतातील अती अवर्षणग्रस्त भाग सोडला तर विहीर नसलेले गाव आपणास विरळानेच आढळेल. ज्या गावात वा वस्तीत नदी, ओढा वा तळी नसतात तेथे साधारणपणे विहिरी खणल्या जातात हा इतिहास व वस्तुस्थिती आहे. बारव म्हणजे देखील विहीरच होय. ज्या विहिरींना आत उतरण्यासाठी पायऱ्या असतात त्यांना मराठीत बारव वा पुष्करणी म्हटले जाते. बारवांना राजस्थानात बावली वा बावडी, तर गुजरातमध्ये वाव म्हटले जाते. आपल्या असे लक्षात येते की, भारताच्या पश्चिम भागात म्हणजेच गुजरात व राजस्थानात अनेक शतकांपूर्वी बारवा खणल्या गेल्या. याचे कारण हा भाग कमी पावसाचा आहे हे असावे. पावसाळा कमी, त्यामुळे पाण्याची उपलब्धता कमी व त्यामुळे पाणी वर्षभर उपलब्ध व्हावे या दृष्टीने या बारवा खणल्या गेल्या असाव्यात. विहिरीला पायऱ्या असल्यामुळे पाण्याची पातळी खोलवर गेली तरी पाणी काढण्यास त्रास होऊ नये हा त्यामागचा तर्क असावा. विहिरीवरून पाणी आणणे हे अनेकदा घरातील स्त्रीचे काम असायचे हे आपल्या लक्षात येते. त्यामुळेच पाणी खोलवर गेल्यावर स्त्रियांना विहिरीत उतरून पाणी घेऊन पायऱ्यांनी सुरक्षितपणे वर येता यावे यासाठी देखील पायऱ्या असलेल्या विहिरी म्हणजेच बारवा बांधल्या गेल्या असाव्यात असे म्हणणे तर्कसंगत वाटते. बारवा या साधारणपणे मंदिराच्या बाजूला, गावाच्या सीमेच्या आतल्या बाजूला वा गावाच्या सीमेच्या बाहेर बांधलेल्या आढळतात.

इसवीसनाच्या तिसऱ्या शतकापासून भारतात खडक फोडून विहिरी खणल्याचे पुरावे सापडतात असे आपल्या वाचनात येते. तसेच साधारणपणे याच काळापासून प्राचीन समयी गुजरातमध्ये वाव म्हणजेच बारव खणल्या जात असत असे तज्ज्ञांचे मत आहे. याचा अर्थ असा की, बारव खणण्याचे ज्ञान भारतीयांना हजारो वर्षांपासून आहे व त्यामुळेच हा भारताचा एक महत्त्वाचा ऐतिहासिक वारसा आहे. याहून महत्त्वाचे म्हणजे अनेक शतकांपूर्वी खणलेल्या बारवांचा वापर आजही अनेक गावांमध्ये केला जातो याचा आपल्याला सार्थ अभिमान वाटला पाहिजे. येथे एक कौतुकाची बाब नमूद करावीशी वाटते

की, मुंबईतील श्री रोहन काळे व त्यांच्या चमूने गावागावात जाऊन महाराष्ट्रातील बारवांची छायाचित्रे घेतली आहेत. हे काम निश्चितच प्रशंसनीय आहे. त्यामुळेच भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आपल्या एका 'मन की बात' मध्ये याचा उल्लेख करून श्री रोहन काळे यांचा यथोचित गौरव केला आहे. येथे एक गोष्ट खेदाने नमूद करावीशी वाटते व ती म्हणजे आपणा भारतीयांना आपला इतिहास, संस्कृती व ऐतिहासिक वारसा यांचा अभिमान असतो; परंतु त्यांचे जतन करण्याच्या बाबतीत मात्र आपण उदासीन असतो. एवढेच काय, आपण अनेक ऐतिहासिक स्थळांना फिरण्याचे व तेथे जाऊन आपली नावं कोरण्याचे व अगदी मद्यप्राशन करून पार्ट्या झोडण्याची ठिकाणे बनवून ठेवले आहे. याबाबतीत आपल्याला महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे उदाहरण देता येईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील किल्ल्यांचे आपण व्यवस्थितपणे जतन करू शकलेलो नाही; यासारखी दुसरी शोकांतिका नाही. छत्रपती शिवराय म्हणजे महाराष्ट्राचे दैवत. परंतु त्यांनी जे किल्ले आदिलशहा व मोगलांकडून जिंकून घेण्यासाठी लढाया लढल्या, मुत्सद्दीपणाने जे राजकीय डावपेच टाकले व ज्या असंख्य मावळ्यांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले व रक्त सांडले त्याचे आपण आज हेच चीज केले काय असा प्रश्न पडतो. आज अनेक गड व दुर्ग प्रेमींना वर्षभरात फक्त या ठिकाणचा कचरा व मद्याच्या रिकाम्या बाटल्या उचलण्यासाठी मोहीमा राबवाव्या लागतात यासासारखी दुसरी शोकांतिका नाही. असो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, आजही अनेक ठिकाणच्या बारवांचे जतनच केलेले नाही तर त्या वापरात आहेत ही फार भूषणावह बाब आहे.

येथे आपल्या ठाणेकरांच्या दृष्टीने एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे बदलापूर येथे एक प्रसिद्ध बारव आहे. ही बारव देवळोली या गावात आहे. ही शिवपिंडीच्या आकाराची बारव असून, आत उतरण्याच्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींवर गणपती, कमळाचे फूल, सिंह आदी गोष्टी कोरलेल्या आहेत. यातून अगोदर नमूद केल्याप्रमाणे पाण्याला व त्या अनुषंगाने पाणवठ्यांना भारतीय संस्कृतीत व हिंदू तसेच बौद्ध धर्मांमध्ये किती अनन्यसाधारण महत्त्व आहे हे लक्षात येते. गणपती म्हणजे भगवान शिवाचे उपासक, कमळाचा संबंध भगवान विष्णूशी व सिंह म्हणजे दुर्गामातेचे वाहन. त्यामुळे यांचे शिल्प कोरलेली ही बदलापूरमधील बारव म्हणजे हिंदू धर्मातील शैव व वैष्णव उपासक या दोहोंच्या दृष्टीने महत्त्वाची असावी असे अनुमान काढता येते. तसेच भारतामध्ये हिंदू धर्मातील विविध पंथ गुण्यागोविंदाने राहतात याचे हे प्रतीक होय. त्याचप्रमाणे पाणवठा हा भारतीयांना अनादीकालापासून देव-देवतांसारखा वंदनीय व पूज्य राहीलेला आहे हे निदर्शनास येते.

बौद्ध धर्मात देखील विहिरींना अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे जाणवते. याचे कारण महात्मा गौतम बुद्धांचा ज्या लुम्बिनीत जन्म झाला तेथे एक जलाशय होता. तसेच तथागत गौतम बुद्ध जेथे जेथे थांबले तेथे विहिरी होत्या असे दाखले आपणास सापडतात. भगवान गौतम बुद्धांचे महानिर्वाण झाले त्या कुशीनगर (सध्याचे बिहार राज्य) येथे देखील विहीर होती असे अभ्यासक म्हणतात. तज्ज्ञांचे अजून एक महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे सम्राट अशोकाने कोरवून घेतलेल्या बहुतांश शिलालेखांच्या परिसरात विहिरी होत्या. महाराष्ट्रातील बारवांबाबत बोलावयाचे झाल्यास असे लक्षात येते की, राष्ट्रकूट तसेच यादव राजवटींच्या काळात बारवांचे निर्माण झाले होते. नांदेड जिल्ह्यातील कंधार हे तालुक्याचे ठिकाण म्हणजे राष्ट्रकूटांची राजधानी होती. हा प्रदेश गोदावरीच्या खोऱ्यात येतो. कंधारमधून मण्यार नदी वाहते. स्थानिक लोक या नदीला 'मण्याड' असे देखील म्हणतात. या नदीच्या आसपास राष्ट्रकूट काळात उत्तम जलव्यवस्थापन

---

आपल्या आयुष्यात अडचणी येत असल्यास दु:खी होऊ नका,
कारण कठीण भूमिका फक्त चांगल्या कलाकारांना दिल्या जातात.

केले असल्याचे जाणवते. एवढेच नव्हे तर, मण्यार नदीच्या परिसरात अनेक बारवा होत्या. येथे इसवीसनाच्या दहाव्या, तसेच बाराव्या शतकातील बारवा आजही अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येते. या काही बारवा ह्या बारा बगाडाची बारवा, कामाईची विहीर, सटवाईची विहीर या नावांनी ओळखल्या जातात.

चालुक्य राजवटीत सुद्धा जलव्यवस्थापनाकडे कटाक्षाने लक्ष दिल्याचे जाणवते. लातूरमधील हिपळगाव परिसरात चालुक्यकालीन बारव होती असे दाखले एका शिलालेखाच्या आधारे सापडतात. यादवकालीन महाराष्ट्रात देखील पाण्याचा साठा व उपलब्धतेला महत्त्व दिल्याचे जाणवते. यादव काळात महाराष्ट्रात बारवा वा पुष्करणींचे महत्त्व निर्माण झाले होते. माहूर सारख्या दत्तात्रय, रेणूकामाता व अनसूयामातेचे मंदिर असलेल्या व महानुभाव पंथींयांचे देखील महत्त्वाचे स्थळ असलेल्या ठिकाणी सुद्धा यादव काळात जलव्यवस्थापनाकडे लक्ष दिले गेले होते. तसेच यादव काळात बारवांचे निर्माण झालेले होते. अशाप्रकारे एकंदरीतच सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, यादव अशा महाराष्ट्रावर प्राचीन ते मध्ययुगीन काळापर्यंत राज्य करणाऱ्या विविध राजघराण्यांच्या राजवटीत जलव्यवस्थापनाकडे विशेष लक्ष दिले गेल्याचे निदर्शनास येते. यातील बऱ्याच राजवटींनी बारवांचे देखील निर्माण केले होते.

महाराष्ट्रातील बारवा ह्या कोकण, मराठवाडा, विदर्भ अशा विविध भागांमध्ये निर्मिल्या गेल्या होत्या हे जाणवते. येथे एक बाब उल्लेख करण्यासारखी आहे व ती ही की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी जसा अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला तसा बारवांचा सुद्धा जीर्णोद्धार केला. हे त्यांनी केलेले महान कार्य होय यात वाद नाही. त्यामुळे आपला हा ऐतिहासिक वारसा जतन करण्यात मोठी मदत झाली आहे यात वाद नाही.

अशाप्रकारे बारवा या भारताच्या खऱ्या अर्थाने ऐतिहासिक वारसा ठरतात व तो आपण जपला पाहिजे. यासाठी शाळा, महाविद्यालयं, वेगवेगळी समाजमाध्यमं, वृत्तपत्र, इत्यादी माध्यमांच्या मदतीने आजच्या पिढीमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची:**


* ॲना फेल्डहाऊस– नदी आणि स्त्रीत्व (अनुवाद– विजया देव)
* ढवळीकर म. के.– भारताची कुळकथा
* ढवळीकर म. के.– महाराष्ट्राची कुळकथा
* देगलूरकर गो.ब.– प्राचीन भारत इतिहास आणि संस्कृती
* पाठक अरुणचंद्र शं.– महाराष्ट्रातील बारव आणि पारंपरिक जलव्यवस्थापन



**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी–बेडेकर (स्वायत्त), महाविद्यालय,
ठाणे (पश्चिम)– ४००६०६

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com


•••


*दिशा संपर्क दूरध्वनी*
*०२२-२५४२ ६२७०*

# आपण आणि इंग्लंड

*परदेशांत असणारे राजकीय व आर्थिक अस्थैर्य आणि भारतात तुलनेने असणारे स्थैर्य ! यातील तफावतीसंदर्भात असलेला हा लेख – संपादक*

इंग्रजांनी आपला देश सोडून जाऊन आता ७५ वर्षे होऊन गेली आहेत. तरी आजही आपल्या दोन देशांत अनेक साम्यस्थळे दिसतात. त्यात कदाचित या ७५ वर्षांआधी ते १५० वर्षे आपले राज्यकर्ते असण्याचा प्रभाव जास्त असावा. अगदी आजही टिकावा असा !

म्हणतात ना ''वाण नाही पण गुण लागला'' तशातली गत !

आता कोणाला कोणाचा गुण लागला हाही प्रश्न आहे! आणि कोणी किती गुण लावून घेतला हाही प्रश्न आहेच !!

आता हेच बघा ना !

शिंदे – फडणवीस सरकारात ३९ दिवस फक्त मुख्यमंत्री – उपमुख्यमंत्री होते म्हणून आपण सगळे चर्चा करत होतो. त्याआधीच्या उद्धव ठाकरे सरकारात २९ दिवसांनंतर मंत्रिमंडळ विस्तार झाला तरीही आणि तेव्हाही आपण चर्चा केली.

पण हे बरोबर नाही.

कारण हे एका राज्यसरकाराबाबत आहे.

तिथे साहेबांचा अख्खा देश एक 'हंगामी पंतप्रधान' गेले काही दिवस चालवतो आहे. ...

पण जराही हूं नाही की चूं नाही. ...

आपल्या देशातल्या किंवा राज्यातल्या काही जणांना निदान हंगामी स्वरूपात तरी तिकडे पाठवावे काय?

सगळ्यांनाच जरा काहीतरी बदल !

(सध्या श्रीलंकेत सुद्धा 'डामाडोल' सरकार आहे. पाकिस्तान मधे नेहमीच तसेच सरकार असते असेही काही भन्नाट मंडळी म्हणतात. तिथेही आपल्या सारखे इंग्रजांचे राज्य होते आणि तेही याबाबत इंग्रजांसारखीच चर्चा करत नाहीत. ... सवय आपली आपली.)

त्या इंग्लंडमधे चर्चा काय तर 'पुढचा पंतप्रधान कोण होणार?'

ऋषि सुनक की Madam ?

हा काय विषय आहे ?

चर्चेत खमंगपणाच नाही.

आपल्याकडे तसे नाही.

आपला देश कसा पहिल्यापासूनच 'मसाल्यांचा देश' म्हणून प्रसिद्ध !

त्याला अनुसरून आपल्या 'महाराष्ट्र देशी' चर्चा!

आधी मंत्रिमंडळ विस्तार नाही म्हणून चर्चा; आता मंत्रिमंडळ विस्तार झाला तर खातेवाटप केले नाही म्हणून चर्चा !

ज्यांना मंत्रिमंडळात घेतले त्यांना अजून काम दिले नाही म्हणून चर्चा !

बरं, ही चर्चा ज्यांना मंत्रिमंडळात घेतले आहेत ते करतच नाहीयेत.... ते मस्त म्हणत असतील की हे म्हणजे ''शाळेत हजेरीही लागली आणि वर ऑफ पिरियडही मिळाला !''

चर्चा इतकीच मर्यादीत नाही.

---

हास्य ही निसर्गाची आणि देणगीची एक अनोखी भेट आहे,
आपण ती जेव्हा अन् जिथे हवी तशी उधळू शकतो.

ज्यांना घेतले त्यांची चर्चा; ज्यांना घेतले नाही त्यांचीही चर्चा !

अगदी सगळा 'सर्व – समभाव'!

बरं, ही सगळी चर्चा संबंधित सोडून बाकीचेच हिरिरीने करत आहेत.

त्यातही शिंदे – फडणवीस साहेबांचे सरकार एकटे असू नाही म्हणून त्यात आता नितीशकुमार – तेजस्वी यादवांची भर....

याला म्हणतात ''विविधता मे एकता!''

आता शिंदे – फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार झाला तर त्यात महिला – मंत्री नाही म्हणून चर्चा.

त्या चर्चेत काहींनी उपस्थित केलेला मुद्दा म्हणजे उद्धव ठाकरे सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारातही महिला – मंत्री नव्हत्या !

तिकडे इंग्लंडमधेही चर्चा आहे... बऱ्याच वर्षांनंतर इंग्लंडला पुन्हा महिला पंतप्रधान मिळणार का?

तिथे अनेकांच्या मते चर्चेच्या आतापर्यंतच्या फेऱ्यांत जरी ऋषि सुनक आणि Madam यांच्यात जरी अगदी ''काँटे की टक्कर'' अशी रस्सीखेच दिसत असली तरी प्रत्यक्षात अंतिमतः ऋषि सुनक इंग्लंडचे पंतप्रधान होण्याची शक्यता जरा कमी आहे. त्या देशात याबाबत होणारी अशी चर्चा जितकी इंग्लंडच्या भावी संभाव्य पंतप्रधानपदासाठीच्या दोन्ही प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या तुलनात्मक शक्ती – ताकद – सामर्थ्य याबाबत आहे तितकीच ती राजकीय भावनिक संवेदनशीलतेचीही आहे. आणि चर्चेचा हा पदर असा आहे की, आजही ''अशियाई'' (म्हणजे भारतीय?) वंशाचा, त्यातही हिंदू माणूस इंग्लंडचा पंतप्रधान म्हणून कितपत स्वीकारला जाईल?

ज्या पद्धतीनं अलीकडच्या फेऱ्यांत दिसणारे चित्र आहे त्यात हे प्रतिबिंब दिसू लागले आहे.

हा विषय सामाजिक शास्त्र (सोशिओलोजि) म्हणूनही महत्त्वाचा आहे आणि राज्यशास्त्र म्हणूनही...

अशी चर्चा पाहताना आपल्या देशातल्या अगदी स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या निवडणुकांत होणाऱ्या विविध समीकरणांची चर्चा आठवते ना !

या मुद्द्यांची चर्चा इंग्लंडमधे कशी होते याबाबत गेली अनेक वर्षे इंग्लंडमधे स्थायिक असणाऱ्या आणि सामाजिक दृष्ट्या सक्रिय असणाऱ्या काही परिचितांशी बोलताना जाणवलेली एक गोष्ट म्हणजे ऋषि सुनक यांची निवड अंतिमतः होण्याची शक्यता तुलनेने कमी असण्यात. वरील मुद्द्यांचा जो भाग आहे तो निर्णायक ठरण्याची दुसरी बाजू अशी आहे की, यावर उत्तर म्हणून असे अशियाई वंशाचे मतदार एकत्र करण्याचा प्रयत्न जरी आता केला तरी त्याचा फारसा उपयोग होणार नाही. निदान यावेळेस तरी त्याला आता उशीर झाला आहे. कारण मुळातच इंग्लंडमधल्या राजकीय प्रशासनात्मक उतरंडीत अशियाई (अशियाई हिंदू) फारसे सक्रिय नाहीत.

आपल्या इथे याबाबत राजकीय चर्चेत (निदान चर्चेत की फक्त चर्चेतच?) परवलीचे ठरलेले शब्द असे प्रतिबिंबित होतात का?

याबाबत चर्चा करत असताना इंग्लंड – निवासी परिचितांना मी सहज विचारले की 'जर खरोखरच ऋषि सुनक इंग्लंडचे पंतप्रधान झाले नाहीत तर ते काय करतील?'

त्यावर अशा सर्व परिचितांनी एकासुरात सांगितले की ऋषि सुनक तात्पुरते तरी राजकारण सोडतील किंवा अगदी पहिल्यापासून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरवात करतील !!

तसेही ऋषि सुनक हे त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात काही म्युच्युअल फंडांचे मालक आहेत.

(पृष्ठ क्र. २५ वर)

नास्तीकपणा हा फक्त माणसाच्या ओठावर असतो, तो त्याच्या मनात नसतो.

# हैदराबाद मुक्तीसंग्राम: विस्मृतीत गेलेले मुस्लीम धर्मांधांनी घेतलेले बळी

*हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा आढावा या लेखात घेतला आहे. - संपादक*



भारतीय स्वातंत्र्याला पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झाली तरी निजामाच्या अधिपत्याखालील आपला मराठवाडा, तेलंगण व कर्नाटकाचा काही भाग यांना ते भाग्य मिळण्यास मात्र काही काळ जावा लागणार आहे. हैद्राबादच्या निजामाविरुद्धची लष्करी कारवाई १३ सप्टेंबर १९४८ पासून सुरू झाली आणि चार दिवसात संपली. निजाम विनाशर्त शरण आला. तत्पूर्वी रझाकार या त्याच्या निमलष्करी दलाने सुमारे दोन लाख हिंदूंच्या हत्या केल्या गेल्या असा एक अंदाज आहे. देशाच्या फाळणीच्या बरोबरीने घडलेला हा भयानक कालखंड आता जवळजवळ विस्मृतीत गेला आहे. निजामाला वेसण घातण्यात अक्षम्य उशीर केला गेल्यामुळे हा काळाकुट्ट अध्याय घडला आणि लक्षात घ्या, निजामाच्या हैद्राबाद संस्थानात तेव्हा केवळ ११% मुस्लीम होते.

स्वामी रामानंदतीर्थ हे निजामाविरुद्धच्या नागरी लढ्यातील एक प्रमुख नाव. गोविंदभाई श्रॉफ हे आणखी एक प्रमुख नाव आपल्याला माहीत असते. स्वामीजींचे खरे नाव व्यंकटेश भगवान खेडगीकर. त्यांचा जन्म विजापूर जिल्ह्यातला. वयाच्या २९व्या वर्षी त्यांनी संन्यासाश्रमाची दीक्षा घेतली. त्यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगे आणि अंबेजोगाईमधील शाळांमध्ये मुलांची हुशारी वाढण्याबरोबरच त्यांची आध्यात्मिक प्रगती होईल अशा पद्धतीने शिक्षणाचे प्रयोग केले. गरीबांचे आयुष्य कसे बदलेल याचा त्यांना ध्यास होता. त्यांनी देशातील कामगार चळवळीचे जनक समजले जाणारे ना. म. जोशी यांच्याबरोबर काही काळ काम केले.

पुढे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर ते दोन वेळा लोकसभेवर निवडून गेले. नंतर मात्र मनाशी निश्चय करून ते राजकारणातून बाहेर पडले.

आझाद हिंद सेना असो वा पोर्तुगीज-निजामावरील लष्करी कारवाई, दट्ट्याचा प्रयोग केल्याशिवाय अंतिम लक्ष्य साध्य होत नाही हे दिसले. स्वामीजींची चळवळ अगदी मातीतली चळवळ होती; गांधींसारखी ब्रिटिश-धार्जिणी नव्हती. म्हणून तिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ते अनेक वेळा गांधींना भेटले व त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले असले, तरी हा मोठा फरक आहे. गांधींना ब्रिटिशांऐवजी निजामाच्या राज्यात चळवळ उभी करावी लागली असती तर ते कितपत पुढे जाऊ शकले असते, हा अभ्यासाचा विषय ठरेल. 8'x4' च्या खोल्यात इतर सत्याग्रहींशी कसलाच संपर्क येणार नाही असा स्वामीजींसारखा बंदिवास काँग्रेसच्या किती 'फाइव्ह स्टार' नेत्यांनी सोसला? केवळ पंधरा वर्षांचा 'वंदेमातरम' रामचंद्र राव, बोधनकर वगैरेंची नावेच बहुतेक भारतीयांना माहीत नाहीत. ती माहीत होण्यासाठी स्वामीजींचे 'हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती' हे पुस्तक प्रत्येकाने वाचायला हवे. देशाला पुचाट बनवणाऱ्या अहिंसेच्या

आपण आपले भविष्य बदलू शकत नाही; परंतु आपण आपल्या सवयी बदलू शकता.
आणि नक्कीच तुमच्या सवयी, आपले भविष्य बदलेल.

अतिरेकामुळे देशाची फाळणी टाळणे काँग्रेसच्या चळवळीला शक्य झाले नाही. स्वतंत्र झाल्यानंतरही ते हिंदूंचा हा वंशविच्छेद रोखू शकले नाहीत याचे दुःख कोणाला सांगायचे?

स्वामीजींनी लिहिलेली या लढ्याची हकिकत वाचल्यावर काही प्रश्न पडतात. सगळेच प्रश्न आहेत असे नाही. स्वामीजींची वैशिष्ट्येही त्यातून दिसतील.

१) आजही ओवैसीसारखे लोक निझामाला हाकलल्याचा दिवस साजरा करत नाहीत. या चळवळीत सहभागी झालेल्या मुस्लीम तरुणांची तुरळक नावे वाचण्यात आली तरी हिंदूंना अत्याचारी मुस्लीम निझामाला हाकलायचे होते असे या चळवळीचे बव्हंशी स्वरूप होते. या जनतेचा लढा इतर देशवासियांपेक्षा वेगळा होता. इतरांना ब्रिटिशांपासून मुक्ती हवी होती व ती मिळवण्यासाठी उभ्या केलेल्या चळवळीत देश एकत्र ठेवण्याचा कणखरपणा नसल्यामुळे धर्मांधांमुळे देशाचे तुकडे झाले. इथे ब्रिटिशांविरुद्ध मुक्ती हा फारसा भागच नव्हता. अर्थात 'वंदे मातरम'चा जो मंत्र ब्रिटिशांविरुद्ध चालला, तोच निजामाविरुद्धही चालला हे एक सामायिक वैशिष्ट्य म्हणता येईल. दोन लढ्यांमधील फरकांचे व साम्यस्थळांचे विश्लेषण कोणी केल्याचे पाहण्यात आहे का?

२) लष्करी कारवाई झालीच नसती, तर स्वतःच्या बळावर निजामाला तेथून हाकलून लावण्याएवढे नाकी-नऊ आणण्याइतके सामर्थ्य या चळवळीत होते का? 'सामर्थ्य नव्हते' हे उत्तर असेल तरी त्यात या चळवळीला कमी लेखण्याचे कारण अजिबात नाही. म्हटले तसे ही मातीतली चळवळ होती व त्यामुळे तिचे महत्त्व वादातीत आहे. केवळ आणखी किती काळ लागू शकला असता, याचा अंदाज घेण्यासाठी हे विचारले.

३) इतरत्र दिसते तशी हिंदूंमध्येच मुघल व इतर मुस्लीम राज्यकर्त्यांबाबत व नंतर ब्रिटिशांबाबत मानसिक गुलामीची भावना अगदी आजही दिसते, तसे विश्लेषण निजामाच्या अधिपत्याखालील हिंदूंबाबत कोणी केल्याचे पाहण्यात आहे का?

४) उत्तर भारतातील बोगस गंगाजमना तहजिबचे गुणगान केले जाते, तसे निजामाच्या अधिपत्याखालील हिंदू-मुस्लिमांबाबत करण्याची काही थियरी आहे का? हे विचारण्याचे कारण म्हणजे इत्तेहाद (एमआयएम)च्या धर्मांधांकडून हिंदूंच्या हत्या होणे आधीपासूनच चालू झाले होते. त्यांनी मारलेल्या काँग्रेसच्या पानसरे या नेत्याचे आज कोणालाच स्मरण नसेल.

५) या चळवळीचा प्रभाव मराठवाडा व निजामाच्या अधिपत्याखालील इतर भाग यामध्ये सारखाच होता का की एखादा भाग त्याबाबत उदासिन होता? त्यातल्या त्यात कर्नाटक याबाबतीत मागे होता असे दिसते.

६) गांधींचा बराच सहवास मिळाल्यानंतर व त्यांच्याकडून अहिंसेची शपथ घेतल्यानंतरही प्रत्यक्षात जेव्हा रझाकारांचे अत्याचार सुरू झाले, तेव्हा जनतेने स्वसंरक्षणार्थ उपाय योजायला सुरूवात केल्याचे स्वामीजींनी गांधींना सांगितले. अर्थात यात हाती शस्त्र धरणेही आले. स्वामीजींचे वेगळेपण उठून दिसते ते यात. यावर असे होणे साहजिक असल्याचे गांधी त्यांना म्हणाले. काही महिन्यांपूर्वीच बंगालमध्ये व पाकिस्तानमध्ये हिंदूंची ससेहोलपट होत असताना गांधी त्यांना ते अत्याचार सहन करण्यास सांगत होते. यावेळी गांधींना एकूणच वास्तवाची जाणीव झाली होती असे म्हणायचे का?

७) एकीकडे निजाम पहिली तीन वर्षे मुसलमान अधिकाऱ्यांना ७५% व त्यानंतरची सहा वर्षे हिंदू अधिकाऱ्यांना ७५% प्रतिनिधित्त्व देण्याचा प्रस्ताव मांडत होता. या नऊ वर्षांनंतर काय हे मात्र त्याने सांगितले

नाही. शिवाय आपण मुस्लीम राज्य असल्यामुळे भारत-पाक युद्ध झाल्यास आपण पाकची बाजू घेऊ. निजामाचा प्रतिनिधी स्वामीजींकडे घेऊन येत असलेले असे अजब प्रस्ताव स्वामीजी फेटाळत होते आणि अशा स्थितीत दिल्लीहून निजामाशी एका वर्षाचा 'जैसे थे' करार झाल्याचे कळल्यावर स्वामीजी हतबुद्ध झाले. या कराराप्रमाणे भारताला निजामाच्या राज्यात आपले लष्करही ठेवता येणार नव्हते.

८) भारतीय लष्कर हैद्राबादकडे जात असताना मुसलमानांकडून विरोधाचे तुरळक प्रकार झाले. अर्थात सैन्यापुढे कोणाचाच टिकाव लागला नाही व याची बातमी हैद्राबादपर्यंत पोहोचल्यावर सैन्याचे काम सोपे झाले. औरंगाबादच्या एका प्राध्यापकाने रस्त्यावरची शंभर मुस्लीम पोरे उचलून व त्यांना जमेल तसे शस्त्रसज्ज करून सैन्याला 'रोखण्याचा' प्रयत्न केला होता. या प्राध्यापकाचे व पोरांचे काय झाले हे कळले नाही तरी औरंगाबादमधील कट्टर मुस्लीम त्यांचे स्मरण करत नाहीत (म्हणजे तसे कधी वाचण्यात आले नाही) हे विशेष समजायचे की, मुक्तीदिन साजरा करत नाहीत हे?

९) स्वातंत्र्यानंतर लगेचच काँग्रेस नैतिकतेपासून फार दूर जात असल्याचे स्वामीजींच्या लक्षात आले. त्या काळात काँग्रेसला देशात तुल्यबळ प्रतिस्पर्धी नसल्यामुळे त्यांच्या काँग्रेसकडून अपेक्षा होत्या. त्याबाबत काही निवडक उपाययोजना करण्याबाबत त्यांनी नेहरूंना लिहिले असता, 'तसे करणे लोकशाहीच्या विरोधात होईल' असे म्हणत, एरवी जगभरची मनमानी करणाऱ्या नेहरूंनी त्यांचे सांगणे झिडकारले होते.

**राजेश कुलकर्णी**
पुणे

•••

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांच्या अथक प्रयत्नांतून साकारलेल्या वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयास समर्पित.**

**ज्ञान बिंदूचा सिंधू भराया करू अखंड प्रार्थना...**

त्यागाचे हे ज्ञान निकेतन
इथे करा रे हृदय समर्पण ।
अपरान्त भूमीचे ऋण फेडाया
करू अथक साधना ।।
ज्ञान बिंदूचा सिंधू भराया...

इथे एकची व्रत अमुचे
माणिक बनवू विद्येचे ।
वाशिष्ठी सम भव्य दिसाया
करू अथक साधना ।।
ज्ञान बिंदूचा सिंधू भराया...

दिप दिप हा जोडावा
ज्ञान यज्ञ तो उजळावा ।
अज्ञान तिमीर सदा हटवाया
करू अथक साधना ।।
ज्ञान बिंदूचा सिंधू भराया...

शिव शंभुचे तेज अंबरी
सह्याद्रीच्या कडे-कपारी ।
कीर्ती ध्वज जगी आपुला लावाया
करू अथक साधना ।।
ज्ञान बिंदूचा सिंधू भराया...

साक्षी असे तो अथांग सागर
कार्य बघाया आपुले निरंतर।
सृजनता ही मनी रुजाया
करू अथक साधना ।।
ज्ञान बिंदूचा सिंधू भराया...

**अविनाश पवार**
उपप्राचार्य
विद्या प्रसारक मंडळाचे महर्षी परशुराम
अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

आजच्या आनंदाच्या क्षणी, उद्याचे स्वप्न आणि समाधान कायम राहील;
पण उद्याच्या चिंतांमध्ये आजचा आनंद गमावू नका.

# मार्कंडा - देव

*पूर्व विदर्भातील जि. गडचिरोली, तह. चामोर्शी या भागात असणारे मार्कंडा - देव, हे स्थळ प्राचीन काळापासून शैव संप्रदायाचे मोठे केंद्र राहिलेले आहे. त्या विषयीची माहिती या लेखात दिलेली आहे.- संपादक*

'महामृत्युंजय मंत्रा'च्या उगमाचा शोध घेत असता, आपण पोहोचतो ते थेट लोकमानसात युगायुगांपासून अमर्त्य ठरलेल्या मार्कंडेय ऋषीं पर्यंत..! मार्कंडेयांविषयीची कथा बहुतेकांना विदीत असली तरी ती थोडक्यात इथे मांडत आहे.



फार पुरातन काळी, दक्षिणेत (बहुधा आत्ताच्या आंध्रप्रदेश व तमिळनाडूच्या सीमेवर) मृकांडूऋषी आणि मरुदेवी नावाचं भक्तवत्सल जोडपं राहात होतं. त्यांना मूलबाळ नव्हतं. मृकांडू ऋषी सतत शिवाच्या उपासनेत तल्लीन असायचे. मात्र, एकदा पुत्र नसल्याच्या जाणिवेनं व्याकूळ झालेल्या पत्नीची व्यथा बघून त्यांनी या बाबत शिवाकडे उपाय विचारण्याचे मनात आणले. क्षणांत भोलेनाथ प्रगट झाले. ऋषींनी व्यथा व्यक्त केली. त्यावर उपाय म्हणून भोलेनाथांनी दोन पर्याय सुचविले. पहिला पर्याय होता शंभर वर्षे आयुष्य असलेले शंभर मुले आणि दुसरा होता, सोळा वर्षे आयुष्य असणारा, पण दिव्य कांती लाभलेला, तेजस्वी आणि हुशार मुलगा..! ऋषींनी दुसरा पर्याय निवडला. थोड्याच दिवसांत मरुदेवीच्या पोटी सुंदर बालकाने जन्म घेतला. नांव ठेवले मार्कंडेय. हे बाळ चंद्रकोरीप्रमाणे कलेकलेने वाढू लागले. त्याची हुशारी बालपणापासून दृग्गोचर व्हायला लागली. अल्पावधीत तो सर्व शास्त्रात आणि वेदात पारंगत झाला. मात्र त्याच्या या यशाचे मातापित्यांकडून पाहिजे तसे कौतुक होत नव्हते. याचा शोध घेत असता, आपले अल्प आयुष्य याच्या मुळाशी असल्याचे मार्कंडेयाला कळले. तेंव्हा, आपल्याला जीव देणारा, सृष्टीत आणणारा शिवच यावर मार्ग दाखवेल या श्रद्धेपोटी त्याने शेवटचे वर्ष वनात जाऊन भोलेनाथांची पूजा बांधण्याची इच्छा आई - वडिलांजवळ व्यक्त केली. गहन विचारांती त्यांनीसुद्धा यास अनुमोदन दिले.



मार्कंडेय घरापासून दूरवर निघून घनदाट जंगलात तपश्चर्या करण्यात मग्न झाले. वर्ष कसं संपलं ते कळलेच नाही. सोळावं वर्ष संपण्याचा दिवस उजाडला. विधीलिखितानुसार यमदेव प्रगट झाले. त्यांनी आपले पाश मार्कंडेयांच्या मानेभोवती टाकून ते आवळण्यास सुरुवात केली. ताबडतोब मार्कंडेयांनी पिंडाला कवटाळून आर्त स्वरात शंकरांचा धावा सुरू केला. महादेव द्रवले आणि स्वयं प्रगट होत उजव्या हाताने मार्कंडेयाला

जेव्हा आयुष्य हसवेल तेव्हा समजा चांगल्या कर्माचे फळ आहे आणि
जेव्हा आयुष्य रडवेल तेव्हा समजा चांगले कर्म करण्याची वेळ आली आहे.

कवटाळले व डाव्या हातात असलेला त्रिशूळ यमाच्या नरडीशी लावला. शिवाच्या क्रोधापुढे यमराज हतबल झाले आणि त्यांनी आपले पाश काढून घेतले. पण, या धुमश्चक्रीत शिवाला तहान लागली. त्यांनी मार्कंडेयांकडे पाणी मागितले. तेंव्हा, मार्कंडेयांनी दूरवर वाहणाऱ्या वैनगंगेला काठीने जवळ येण्याचा इशारा केला. वैनगंगा तत्क्षणी प्रवाहाचा मार्ग बदलत, मागे वळून शिवाच्या जवळ आली. यथेच्छ पाणी पिऊन तृप्त होत महादेवांनी मार्कंडेयांना अमरत्वाचा आशीर्वाद दिला आणि लोककल्याणाचे कार्य करण्याचे सुचवत अंतर्धान पावले.

अशा या कथेचा उल्लेख रामायण आणि महाभारत या दोन्ही भारतीय महाकाव्यात येतो. हे रामायण जिथे घडलं, ते स्थळ म्हणजे अनादिकालापासून प्रसिद्ध असलेली विदर्भाची गंगा- वैनगंगेच्या काठी असलेलं, जि- गडचिरोली, तह.- चामोर्शीतील मार्कंडा हे गाव. आजही वैनगंगा इथे उत्तरवाहिनी होत कैचीच्या पात्याप्रमाणे सुमारे दोन मैल वक्री होत, मागे वळण घेताना स्पष्ट दिसते. या वक्री मार्गाच्या अगदी मधोमध, शिल्प आणि स्थापत्याचा उत्कृष्ट कलाविकास असलेलं मार्कंडेश्वराचं मंदिर! त्याच्या शिल्पवैभवामुळे त्यास विदर्भाचे 'खजुराहो' म्हणूनही ओळखले जाते.

या मंदिराच्या निर्मितीच्या काळाविषयी अनेक मते प्रचलीत आहेत. काही भक्तांच्या मते ते रामायण कालाच्या आधीपासून अस्तित्त्वात आहे. त्यांच्यामते प्रभू श्रीराम रामटेकला आले असता, त्यांना दूरवर रामटेकच्या गडापेक्षाही उंच, गगनाला भिडू पाहणारा मंदिराचा कळस दिसला. आपल्यापुढे कुणीतरी आव्हान उभे केल्याचे जाणवून, रामाने रागाच्या भरात बाणाने वेध घेत त्या कळसाचा विध्वंस केला. कळस गळून पडले..! मंदिर भोंडे झाले..! आणि आजतागायत ते तसेच आहे. किन्वदंतीचा हा प्रकार सोडला, तरी हा मंदिर समूह इसवीसनाच्या दहाव्या- अकराव्या शतकात बांधला असावा, असे बरेचसे पुरातत्त्वज्ञ मान्य करतात. मात्र, हे स्थळ धार्मिक क्षेत्र म्हणून इसवीसनाच्या सहाव्या- सातव्या शतकापासूनच प्रसिद्धीला आले होते. याला बळ मिळते ते येथे असलेल्या शिलालेखातील प्रयश्री आणि बप्पनागश्री या नांवावरून..!

मार्कंडा येथील मंदिरसमूहाचा आधुनिक जगास सर्वप्रथम परिचय करून दिला तो अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी १८७३ साली. त्यांच्या अहवालानुसार त्यावेळी येथे एकूण चोवीस मंदिरे होती. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या १९२४ - २५ च्या अहवालात वीस मंदिरांचा उल्लेख येतो, तर १९७३ च्या शां. भा. देव यांनी केलेल्या सर्वेक्षणात अठराच मंदिरे होती. हेन्री कझिन्सच्या अहवालानुसार सुमारे १२० वर्षांपूर्वी गोंड काळात मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यात आला होता.

या मंदिरसमूहास एका संरक्षक भिंतीने वेढलेले असून, त्यास एकूण तीन प्रवेशद्वारे आहेत. यापैकी दक्षिणेकडचे द्वार प्रमुख आहे. इथे अद्यापही सुस्थितीत असलेल्या एकूण दहा मंदिरांपैकी मार्कंडेश्वर मंदिर, मकुंड ऋषी मंदिर, यमधर्म व दशावतार ही मंदिरे महत्त्वपूर्ण आहेत. यातही लाजबाब ठरते ते मार्कंडेय मंदिर..तीन प्रवेशद्वारयुक्त सभामंडप, चतुरस्त्र गर्भगृह आणि या दोहोंना सांधणारे अंतराळ अशी या मंदिराची रचना आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून पूर्वेकडील प्रमुख प्रवेशद्वारासमोर स्वतंत्र सभामंडप आहे. या मंदिराचे शिखर नागर शैलीचे असून, त्याच्या चार टोकास चार लघु शिखरे आहेत. प्रवेशद्वारापुढे पूर्वी अर्धमंडप म्हणजे 'पोर्च' होते. परंतु ते आता नष्ट झालेले आहे. मंदिराच्या भिंतींवर रामायण आणि महाभारतातील विविध प्रसंग कोरलेले आहेत. मुख्य लिंग (पाताळलिंग) जरा खोलात आहे. त्यामुळे पायऱ्या उतरूनच गर्भगृहात जावे लागते. गर्भगृहाच्या

प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस आकर्षक भौमितिक नक्षी घंटाकारांनी सजविल्या आहेत. मंदिरामध्ये देव-देवतांच्या प्रतिमा आहेत. येथे व्यालांचे विविध प्रकार बघायला मिळतात.

या मंदिराचा सर्वात आकर्षक भाग म्हणजे त्याचा जंघा भाग होय. त्यात चारशेच्यावर मूर्त्या कोरल्या आहेत. त्यात प्रामुख्याने शिवाची विविध रूपे, अष्टदिक्पाल, शार्दूल प्रतिमा, तसेच अनेक मिथुन शिल्पे आहेत. सध्या, मार्कंडा मंदिर समुहातील मंदिरांच्या शास्त्रीय जीर्णोद्धाराचे कार्य पुरातत्त्व विभागाद्वारे सुरू आहे. त्यात संपूर्ण देवालयातील दगड सुटे करून त्यांना व्यवस्थित क्रमांक देऊन त्याची पुनर्बांधणी करण्यात येत आहे. उद्ध्वस्त भाग मात्र जुन्या स्थापत्यशैलीनुसार नव्याने बांधण्यात येत आहे. लवकरच हे कार्य सिद्धीस जाऊन मार्कंडेशवर मंदिर पुन्हा एकदा जुन्या शैलीतील नव्या स्वरूपात होईल. अशाप्रकारे हे विदर्भातील पहिलेच जतन व संरक्षणाचे कार्य आहे. यामुळे मार्कंडेयांचं हे स्थान त्यांना मिळालेल्या अमर्त्याच्या वरदानासारखंच अमर होईल यात शंकाच नाही.

वास्तवात, एक शिल्प, एक प्रतिमा, एखादं अक्षर नष्ट झाल्यानं केवळ तो दगडच मरत नाही,तर त्याच्या सोबत त्यानं पाहिलेले संदर्भ मृत पावतात. ते संदर्भ जिवंत पाहिजे असतील तर दगडांचा जीव जपलाच पाहिजे.

काहीही असो, मार्कंडेयांच्या मंदिर समुहाचा जीर्णोद्धार होतो आहे हे बघून अत्यानंद होतो आहे.

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर. ४४००२५
मो. नं. ९८३४६३६६५५
E-mail.wandalkardilipgmail.com

•••

(पृष्ठ क्र. १९ वरून - **आपण आणि इंग्लंड** )

जे अंतिम फेरीत विजयी होत नाहीत ते आपल्या देशात काय करतात आणि त्याबाबत आपण काय चर्चा करतो ?

कृती काय करतो... तेही आणि आपणही !

अशी चर्चा करत असताना असेही मनात आले की, याबाबत कारणीभूत असणारा, निदान पार्श्वभूमीवर तरी, असा घटक म्हणजे इंग्लंडची सध्याची किंवा अलीकडच्या काळातील आर्थिक स्थिती आणि त्याचे कारण आणि परिणाम दोन्ही असणारी राजकीय स्थिती.

इथे अगदी आवर्जून लक्षात घेण्याजोगा घटक म्हणजे अगदी काही आठवड्यांपूर्वी ब्लूमबर्गने जाहीर केलेला पाहणी - अहवाल. त्या अहवालानुसार आजमितीस आणि येणाऱ्या काळात महागाई आणि मंदीचा धोका सगळ्यात कमी असणारा देश म्हणजे आपला भारत. आणि त्याच पाहणी अहवालात सांगितले आहे की, ज्या देशांना महागाई - मंदीचा येत्या काळात फटका बसण्याची शक्यता असणाऱ्या देशात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड यांचा समावेश असू शकतो. आणि यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे या देशांत असणारे राजकीय व आर्थिक अस्थैर्य आणि भारतात तुलनेने असणारे स्थैर्य !

असाही आजादी का अमृत - महोत्सव !!!

**- चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्र मणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

कासवाच्या गतीने का होईना पण रोज थोडी थोडी प्रगती करा,
खूप ससे येतील आडवे; बस्स त्यांना हरवायची हिम्मत ठेवा.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**शारदोत्सव -**

- सालाबादप्रमाणे याही वर्षी शारदोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. इ. ५वी - ६वी साठी आरती ताट सजावट व फुलांची रांगोळी, इ. ७वी-८वी साठी भोंडल्याची गाणी व कलश सजावट, इ. ९वी - १०वी साठी आरती स्पर्धा व मेहंदी स्पर्धा दि. ३/१०/२०२२ रोजी दोन्ही विभागात उत्तमरित्या पार पडली.
- दि. ४/१०/२०२२ रोजी दोन्ही विभागात भोंडल्याचा कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांना खिरापतही वाटली.

**राष्ट्रीय बालवैज्ञानिक परिषदेतील यश -**

रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी के.आर. केतकर विद्यालय, डोंबिवली येथे राष्ट्रीय बालविज्ञान परिषदे अंतर्गत जिल्हापातळीवर परिषद संपन्न झाली.

यामध्ये संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील विविध शाळांतील १६८ प्रकल्प बालवैज्ञानिकांनी सादर केले होते. त्यापैकी २७ प्रकल्पांची निवड राज्यपूर्वपातळीवरील परिषदेसाठी झाली.

या २७ प्रकल्पांमध्ये डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) शाळेतील चार प्रकल्पांची निवड झाली आहे.

१) खाडीशेजारील मातीतील सूक्ष्मजीवांचा अभ्यास व उपयोग.

२) चिलटांचा अभ्यास व त्यावरील उपचार.

३) कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे होणारे प्रदूषण व त्यावर उपाय.

४) अन्नपदार्थ पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टीक कंटेनरला पर्याय.

वरील प्रकल्पांना श्री. शिरापुरी, सौ. माने, सौ. झंझाड, श्री. तळेले, तसेच श्री. अभिजित जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

- **रोटरी क्लब, ठाणे आयोजित स्पर्धांमधील विद्यार्थ्यांचे यश**

१) दि. २६/११/२०२२ रोजी रोटरी क्लब, ठाणे यांच्यातर्फे 'युवा संसद' आयोजित करण्यात आली होती. त्यात आठवी, नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात (९वी अ) कृतिका शेडगे हिचा तृतीय क्रमांक आला.

२) दि. २४/११/२०२२ रोजी निबंध, पत्रलेखन, वादविवाद, वक्तृत्व स्पर्धांची प्रथम फेरी शाळेत घेण्यात आली. त्यात १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ८३ विद्यार्थ्यांची निवड झाली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची २७/११/२०२२ रोजी Indo Scots Global School, राममारुती रोड, घंटाळी, ठाणे येथे द्वितीय फेरी घेण्यात आली. त्यामध्ये ९ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

सौ. संगीता तातळे, सौ. रुणाली पोटे, सौ. अश्विनी रोंगटे, सौ. साक्षी दातार आणि मा. मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

- शनिवार ३/१२/२०२२ व रविवार ४/१२/२२ रोजी राष्ट्रीय बालवैज्ञानिक परिषदे अंतर्गत राज्यस्तरावर प्रकल्पांचे Online सादरीकरण करण्यात आले.

या फेरीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २४० प्रकल्पांमधून आपल्या शाळेतील 'अन्नपदार्थ पॅकींगसाठी वापरल्या

जाणाऱ्या प्लास्टीक कंटेनरला पर्यायी उपाय' या प्रकल्पाची निवड राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्प सादरीकरणासाठी झाली आहे. सहभागी विद्यार्थिनींची नावे: १) कु. मृण्मयी श्रीधर भोसले (९अ) २) कु. तन्मयी श्रीधर भोसले (८ब)

श्री. संजय तळेले यांनी वरील प्रकल्पास मार्गदर्शन केले आहे.

**राज्यस्तरीय राज्यपुरस्कार परीक्षा –**
**स्काऊट – गाईड**

दि. १८/११/२०२२ ते दि. २१/११/२०२२ या कालावधीत राज्य प्रशिक्षण केंद्र रामबाग भोर, पुणे येथे गाईड राज्य पुरस्कार परीक्षा पार पडली. या परीक्षेत आपल्या शाळेतील १० गाईडस् झाल्या होत्या. सौ. कल्पना बोरवणकर यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच २८/११/२०२२ ते १/१२/२०२२ या कालावधीत स्काऊट राज्य पुरस्कार परीक्षा पार पडली. या परीक्षेत ७ स्काऊट सहभागी झाले होते. श्री. संजय तळेले यांचे मार्गदर्शन लाभले.

**गीता जयंती –**

दि. ५/१२/२०२२ रोजी गीता जयंती निमित्त इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम घेण्यात आला. सौ. बोऱ्हाडे यांनी गीतेविषयी माहिती सांगितली. तसेच गीतेच्या १५व्या अध्यायाचे पठण करून गीतेचे पूजन केले.

दि. ३/१२/२२ रोजी सकाळी ११ वा. महाराष्ट्र विद्यालय, ठाणे येथे गीता जयंती उत्सव मा. ब्राह्मण विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या प्रसंगी डॉ. बेडेकर विद्यामंदिर (मा.वि.) सौ. सई संतोष दडपे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या प्रसंगी सौ. दडपे यांनी विद्यार्थ्यांना 'श्रीमद्भगवत-गीता अध्ययन का करावे?' याविषयी मार्गदर्शन करून गीतेचा महिमा सांगितला. सकारात्मक स्वयंसूचना, आत्मविश्वास वाढविणे महत्त्व विषद केले.

दि. १० व ११ डिसें. २०२२ रोजी प्राच्यविद्या अभ्यास संस्था ठाणे (प.) या ठिकाणी ''बारव या भारतीय मनोहारी सांस्कृतिक वारसा'' या डॉ. रोहन काळे यांच्या संशोधनपूर्ण प्रदर्शनास मा. डॉ. विजय बेडेकर यांच्या उपस्थितीत डॉ. बेडेकर विद्यामंदिरातील शिक्षिका सौ. सई दडपे आणि सौ. सुप्रिया बोरूळकर यांनी इ. ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांसमवेत भेट दिली. बारव संस्कृती विषयी माहिती घेतली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**प्राप्त पारितोषिके :**

- रोटरी क्लब, ठाणे तर्फे इयत्ता दहावीच्या परीक्षेत पहिल्मा दोन सर्वोच्च गुण मिळालेल्या विद्यार्थांचे Rotarian Arvind Medhekar यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांचा गौरव केला. विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे :
  १) कु. जान्हवी केळकर २) कु. आदित्य गोखले

- मराठी विज्ञान परिषदेतर्फे आयोजित केलेल्या विज्ञान निबंध स्पर्धेत कु. यशश्री दाभोळकर हिने मुंबई कोकण विभाग तसेच राज्य स्तरातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. रोख रक्कम देऊन तिचा सत्कार करण्यात आला.

- 30th Naitonal Children's Science Congress आमोजित कोटकर विद्यालय डोंबिवली येथे दिनांक १३ नोव्हेंबर २०२२ रोजी तालुका स्तरावर प्रकल्प सादर करण्यात आले. या प्रकल्पांपैकी खालील प्रकल्प राज्य स्तरासाठी निवडण्यात आले.

१) Online Product packaging : care or curse (कु. मीरा खरे व कु. तन्वी मेंदूरवार)

२) Mehendi on hands - Natural or chemicals (कु. अवनी देवधर व कु. श्रावणी भाताडे)

---

हास्य हा एक उत्तम उपाय आहे.. संकटांना सामोरे जाण्यासाठी,
मनातील भीती दूर करण्यासाठी आणि झालेलं दु:ख लपवण्यासाठी.

Indo scots Global School येथे दिनांक २७/१२/२२ रोजी Rotaract club of Thane आयोजित Eloquence 6.0 या स्पर्धेच्या अंतिम फेरीचे विजेते खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | विद्यार्थांची नावे | इयत्ता | क्रमांक | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | अनन्या बडगुजर | ६वी | प्रथम | निबंध स्पर्धा |
| २ | वेदांती मानकामे | ५वी | द्वितीय | निबंध स्पर्धा |
| ३ | कार्तीकी शिंदे | ५वी | प्रथम | पत्र लेखन |
| ४ | कार्तीकी शिंदे | ५वी | तृतीय | निबंध स्पर्धा |
| ५ | अनन्या सोमण | ५वी | द्वितीय | पत्र लेखन |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**डॉ. विजय बेडेकर सर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्कार**

कोरोनाच्या दोन वर्षांच्या काळानंतर ९ एप्रिल २०२२ रोजी स्वायत्त के.ग.जोशी कला आणि ना.गो.बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा आनंदात साजरा झाला.

या भव्य कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ठाण्याचे जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर, तसेच विप्रमंचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि त्यांच्या पत्नी सौ. सुमेधा बेडेकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी गार्ड ऑफ ऑनरने केली. त्यानंतर सर्वांनी दिवंगत संस्थापक डॉ.वा.ना बेडेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहीली. या कार्यक्रमाला पदवी व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे ठाण्याचे जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर उपस्थित होते. राजेश सर यांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमात जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त विशेष मानपत्र, तसेच शाल - श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

बेडेकर सरांचे नेतृत्व पुढेही लाभत राहो अशा सदिच्छा देऊन शतायुषी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.



**अभिषेक नेमानेला तृतीय क्रमांक**

राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव अर्थात **इंद्रधनुष्य - २०२२** अहमदनगर येथे संपन्न झाला. दिनांक ५ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर ह्या कालावधीत ह्या युवक महोत्सवात जवळपास २२ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता.



चिंतेएवढे शरीराचे शोषण दुसरे कोणीही करू शकत नाही.

ह्या १८ व्या राज्यस्तरीय युवक महोत्सवात जोशी बेडेकर महाविद्यालय (स्वायत्त) ह्या आपल्या महाविद्यालयाचा तृतीय वर्ष कला शाखेचा विद्यार्थी **कु. अभिषेक संतोष नेमाणे** याने 'मुंबई विद्यापीठा'चे नेतृत्व करत मोठी चुरस असणाऱ्या 'वादविवाद स्पर्धेत' संपूर्ण राज्यात **तृतीय क्रमांक** पटकावला.

विद्या प्रसारक मंडळाच्या के.ग.जोशी कला आणि ना.गो.बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे तर्फे खेळ आणि उत्तम आरोग्य, निरोगीपणा या संदर्भात मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे (Value Added Course in Sports, Fitness Wellness) आयोजन करण्यात आले होते. माननीय प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांच्या मार्गदर्शन आणि प्रेरणेने महाविद्यालयाची जिमखाना समिती, विद्या प्रसारक मंडळाचे स्पोर्ट्स अकॅडमी, आणि स्ट्राइडर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्य हीच खरी संपत्ती' या विषयाच्या अभ्यासक्रमाचे दिनांक ०९ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०२२ असा दहा दिवस आणि तीस तासांचा अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांनी ३० तासांचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २ अतिरिक्त क्रेडिट पॉइंट्स देण्याचे जाहीर केले. सदर अभ्यासक्रमाला ३५ विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग नोंदवला.

या अभ्यासक्रमाअंतर्गत मार्गदर्शनपर व्याख्यान आणि प्रात्यक्षिक असा दोन्हींचा अंतर्भाव करण्यात आला होता. सकाळी ११ ते १२.३० मार्गदर्शनपर व्याख्यान तर १२.३० ते २ असा प्रत्यक्ष मैदानी सराव अशा स्वरूपात नियोजन करण्यात आले होते.



या उपक्रमाचे उद्‌घाटन समारंभ दि.०९ नोव्हेंबर २२ रोजी सकाळी ११ वाजता कात्यायन सभागृह येथे पार पडले, सदर उद्‌घाटनाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुभाष शिंदे सर उपस्थित होते. याचसोबत विद्या प्रसारक स्पोर्ट्स अकॅडमीचे श्री. सुदर्शन जोशी, स्ट्राइडर ग्रुपचे श्री. दीपक लोंढे, श्री. सुशील इनामदार, अतुल सर, वंदना मॅडम उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा. शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मानवी जीवनात खेळाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. या प्रथम दिवसाचे पुष्प श्री. दीपक लोंढे, संस्थापक, स्ट्राइडर ग्रुप यांनी गुंफले, सरांनी निरोगीपणा म्हणजे काय?, उत्तम आरोग्याचे फायदे, आणि खेळच का? या विषयावर मार्गदर्शन केले. सर स्वतः उत्तम ॲथलेटिक असून, सदर क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेते आहेत.

दि.१० नोव्हेंबर श्री. सुशील इनामदार यांनी 'आरोग्याचे विविध स्तर' या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि.११ नोव्हेंबर रोजी श्री. किरण साळगावकर यांनी 'शारीरिक व्यायाम, सामर्थ्य आणि संतुलन' या विषयावर मार्गदर्शन करीत प्रत्यक्ष मैदानातही शरीराचा समतोल कसा राखावा या बाबत प्रात्यक्षिक घेतले. सरांच्या मार्गदर्शनाने अनेक खेळाडू रणजी आणि आयपीएल मध्ये खेळत आहेत.

दि.१२ नोव्हेंबर रोजी श्री. संदीप सोलंकी यांनी 'अपाय टाळण्यासाठी सूर्यनमस्कारांची योग्य संरचना आणि शरीराची ठेवण', त्याचसोबत, 'सूर्यनमस्कार आणि त्याचे प्रकार, शवासन आणि योगनिद्रा यांचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. सोबतच प्रत्यक्षात सदर आसन केले. विद्यार्थ्यांनी सदर सत्राचा आनंद घेतला.

दि.१४ नोव्हेंबर रोजी प्रा. वेदवती परांजपे-सुर्वे यांनी 'खेळाचे मानसशास्त्र' विद्यार्थ्यांसमोर उलगडले.

दि.१५ नोव्हेंबर रोजी प्रा. अविनाश वाघमारे सर यांनी 'कराटे सराव आणि अध्यात्म' याची उत्तम सांगड घातली.

दि. १६ नोव्हेंबर रोजी इस्राईल फर्नांडो यांनी 'बास्केटबॉल आणि उत्तम आरोग्य' या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि.१७ नोव्हेंबर रोजी श्री. विवेक राणे यांनी 'मेंदूची क्रियाशीलता' विषयावर मार्गदर्शन केले. सर उत्तम असे बुद्धिबळ खेळाचे नामांकित कोच आहेत.

दि.१८ नोव्हेंबर रोजी स्ट्राइडर समूहाचे प्रशिक्षक अतुल सर यांनी विद्यार्थ्यांना खेळाविषयी मार्गदर्शन केले, आणि प्रत्यक्ष मैदानात सराव करून घेतला.

दि.१९ नोव्हेंबर रोजी सौ. आरती खाडिलकर यांनी संतुलित आहार, खेळ आणि व्यायामासाठी आवश्यक पोषणतत्त्व या विषयी मार्गदर्शन केले.

सदर उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, त्याचसोबत मॅडम यांनी विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद साधला.

या १० दिवसीय उपक्रमाची जबाबदारी समिती सदस्यांकडे देण्यात आली होती.

या अभ्यासक्रासाठी अभ्यासपूर्व टेस्ट आणि अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर टेस्ट घेण्यात आल्या. यासोबतच प्रत्येक सत्राचा फीडबॅक घेण्यात आला. सर्वांच्या सहकार्याने हा दहा दिवसीय अभ्यासक्रम यशस्वीपणे पार पडला. जिमखाना समिती अध्यक्ष डॉ प्रमोद खराटे यांचे या कामी मोठे योगदान मिळाले.

**जोशी बेडेकर महाविद्यालयात 'कवी जातो तेंव्हा' नाट्य–अभिवाचनाचा प्रयोग संपन्न :**

ठाणे: विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी – बेडेकर स्वायत्त महाविद्यालयात रविवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२२ रोजी कवी ग्रेस यांच्या ललितबंधावर नाट्य–अभिवाचन 'कवी जातो तेंव्हा' या कार्यक्रमाचे आयोजन कात्यायन सभागृहात करण्यात आले होते. 'प्रिय भाई' या नाट्यअभिवाचन कार्यक्रमाचे प्रसिद्ध दिग्दर्शक अमित वझे यांनी या कार्यक्रमाचे दिग्दर्शन केले असून यासाठी त्यांना अपर्णा केळकर, निनाद सोलापूरकर, गजानन परांजपे, जयदीप वैद्य यांची साथ लाभली. यावेळी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, डॉ. महेश बेडेकर, श्री उत्तम जोशी, जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेश पाटील ही मान्यवर मंडळी उपस्थित होती.

विद्यार्थ्यांना कवी ग्रेस यांची ओळख व्हावी, तसेच मराठी साहित्याची व्याप्ती कळावी या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या, 'विद्यार्थ्यांना कवी आणि कवितांचा गाभा लक्षात यावा त्याचबरोबर साहित्याचा हा अनमोल ठेवा जपण्यासाठी त्यांनी जागरूक व्हावे यासाठी हा कार्यक्रम आयोजीत करायचे ठरले. त्यासाठी अमीत वझेंनी आपल्या महाविद्यालयाला या नाट्य–अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्याची संधी दिली. याबद्दल मी त्यांची कृतज्ञ राहीन. या पुढेही असे कार्यक्रम आपण आयोजित करूच.'



यानंतर विद्यार्थ्यांनी या नाट्य–अभिवाचनाचा आनंद लुटला. नाट्य–अभिवाचनामुळे केवळ कवी ग्रेसच नव्हे तर प्रत्येक कवीच्या अंतर्मनातील तळमळ, वेदना अत्यंत मार्मिकपणे सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्या. शेवटी या कार्यक्रमाचे दिग्दर्शक अमित वझे यांनी आपले मनोगत

व्यक्त केले. ते म्हणाले, कवी ग्रेस अत्यंत ग्रेसफुली लोकांपर्यंत पोहोचावे या हेतूने या नाट्य-अभिवाचनाचे प्रयोग करायला सुरुवात केली होती. आतापर्यंत २१ प्रयोग झाल्यानंतर २२ वा प्रयोग आज पहिल्यांदाच संपूर्ण तरुण रसिकांच्या समोर सादर करताना खूप आनंद झाला. यावेळी काही विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

टॅलेंट अकॅडमी, मराठी भाषा विभाग, जनसंवाद व पत्रकारिता विभाग यांनी मिळून कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मानसी जंगम यांनी केले.

**कौशल से कुशल तक**

विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि वा. ना. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाच्या जन संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाकडून 'ऋत' या वार्षिक वृत्तपत्रासाठी दिनांक १७ - १८ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात ह्या वर्षीच्या थीम कौशल से कुशल तक अनुसार विविध कौशल्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता स्पर्धांना सुरुवात करत निवेदिका चैत्राली जोशी यांनी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर महेश पाटील सर आणि प्राध्यापक प्रशांत धर्माधिकारी सर यांचे व सर्व विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचे स्वागत केले. त्यानंतर महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉक्टर महेश पाटील यांनी कार्यक्रमाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर त्वरितच स्पर्धांना सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे नाव "skill-o-pedia" असे होते. या स्पर्धेचा कालावधी १०:३० ते १२:३० इतका होता. या स्पर्धेचे परीक्षण प्राध्यापिका स्नेहा कदम यांनी केले. स्पर्धेला सर्व स्पर्धकांनी अतिशय चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला. गट चार आणि सात मध्ये चांगली चुरस पाहायला मिळाली आणि एका फरकाच्या मताने गट सात मधील केशव आणि शुभम प्रश्नमंजुषा या स्पर्धेचे विजेते ठरले. नंतर १२:५० ते १:३० दरम्यान 'वादविवाद स्पर्धा- मराठी' ही दुसरी स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेचे सूत्रसंचालन समिक्षा राणे यांनी केले. तसेच या स्पर्धेचे परीक्षण वृत्तपत्राची मुख्य संपादिका श्रावणी राऊळ, इंग्लिश विभागाची संपादिका हार्दी गोहिल आणि मराठी विभागाचे संपादक आदित्य पंडित यांनी केले. या स्पर्धेत कल्याणी गलांडे आणि सायली पाटील विजयी ठरल्या.

पुढे आर्टीस्थान ही चित्रकला स्पर्धा २:०० ते ३:३० या कालावधीत पार पडला. या स्पर्धेचे परीक्षण प्राध्यापिका डॉक्टर विमुक्ता राजे यांनी केले. तसेच या कालावधी दरम्यान म्हणजेच २:०० ते ३:३० वाजता सीनेजग स्पर्धाही अत्यंत उत्साहात पार पडली. अनेक सहभागी स्पर्धकांनी एकल अभिनय करत प्रतिष्ठित मान्यवरांच्या भूमिका, तसेच मिमिक्री सादर केल्या. या स्पर्धेचे परीक्षण प्राध्यापिका स्नेहा कदम यांनी केले. सीनेजग या स्पर्धेत सर्वच स्पर्धकांनी अतिशय उत्तम प्रकारे अभिनय सादर केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सुजल दुर्गुळे, तसेच द्वितीय क्रमांक अथर्व गावडे यांनी पटकावला. याच दिवशी शेवटची स्पर्धा पार पडली ती म्हणजे फोटोग्राफी कौशल्य दिसून येणाऱ्या दृश्यांचे चित्रीकरण यात करणे आवश्यक होते. ही स्पर्धा २:०० ते ४:०० या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सुद्धा अनेक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला, तसेच या स्पर्धेत पहिले स्थान - अथर्व पाध्ये, दुसरे स्थान - आंचल निषाद, तिसरे स्थान - साक्षी सुर्वे यांनी पटकावले. त्यानंतर १७ नोव्हेंबर पहिल्या

दिवसाच्या ऋतच्या स्पर्धांची सांगता करता ऋतच्या मराठी विभागातील संपादक आदित्य पंडित याने मान्यवर, स्पर्धक आणि स्पर्धांसाठी लाभलेले इतर मंडळींचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली.

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय आणि लोकराज्य संघटन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

८८ किलो इलेक्ट्रॉनिक आणि प्लास्टिक कचरा जमा करून दिल्याबद्दल ठाणे महानगरपालिकेतर्फे बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाला प्रशस्तीपत्र देण्यात आले.

महाविद्यालयाची Quality Assurance समितीची बैठक १२ नोव्हेंबर २०२२ रोजी संपन्न झाली. यामध्ये विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य श्री जयंत कयाल, रमेश जकाती, श्री दर्भे, IQAC च्या समन्वयक डॉ. विंदा मांजरामकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मोजेस कोलेट आणि सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांचे यश**

स्वर्गीय वसंतराव डावखरे वकृत्व स्पर्धा २०२२ मध्ये अकरावी इयत्तेतील कुमारी रागिणी भोसले हिने द्वितीय पारितोषिक पटकावले.

मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित क्रीडास्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे. ज्यामध्ये कुमारी साक्षी तांबे हिने मुंबई विद्यापीठाच्या विभागीय फेरीमध्ये ७२ किलो गटामध्ये महिला कुस्ती स्पर्धेत रजत पदक पटकावले. तर कुमारी अमृता ठोंबरे हिने ५९ किलो गटामध्ये कास्य पदक पटकावले. कुमार ओमकार चव्हाण या विद्यार्थ्याचं हॉलीबॉलच्या विभागीय तिसऱ्या फेरीमध्ये कास्य पदक पटकावले. कुमारी श्रद्धा पाटील हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कास्य पदक पटकावले. कुमार परमवीर सिंग याने कुस्ती स्पर्धेत कास्य पदक पटकावले. कुमार हर्षद द्विवेदी याने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले.

**शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांचे यश**

भौतिकशास्त्र विभागाचे प्रयोगशाळा सहाय्यक श्री अविनाश बुरंगे यांना रामनिरंजन झुनझुनवाला स्वायत्त महाविद्यालयातर्फे १९ नोव्हेंबर २०२२ रोजी आयोजित 'छंद माझा वेगळा, रंग माझा वेगळा' या स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.



श्री आदित्य म्हात्रे, सहाय्यक प्राध्यापक पर्यावरण शास्त्र विभाग, कुमारी कोमल गायकवाड आणि कुमारी सलोनी शेट यांनी AICTE तर्फे आयोजित Inculcating Universal Human Values in Technical Education पाच दिवसांचा ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला.

**राष्ट्रीय सेवा योजना**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने भ्रष्टाचाराविरुद्ध जागरूकता सप्ताह याबद्दल विविध कार्यक्रमांची सुरुवात झाली. यामध्ये हेमंत सावंत,

अतिरिक्त पोलिस निरीक्षक यांनी विद्यार्थ्यांना झूम प्लॅटफॉर्म च्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

१० नोव्हेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे भ्रष्टाचार विरोधी जनजागृती करण्याच्या निमित्ताने पथनाट्य आयोजित करण्यात आले होते.



मतदार ओळखपत्र जागरुकता कार्यक्रम १८ नोव्हेंबर २०१८ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला.



२६ नोव्हेंबर २०२२ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला, ज्यामध्ये भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले.



### अभ्यास सहल

प्रथम वर्ष वनस्पतीशास्त्र विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी १९ नोव्हेंबर २०२२ रोजी नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ येथे अभ्यास सहली निमित्त भेट दिली.

### मार्गदर्शनपर सत्र

डॉ. ऊर्मिला कुमावत, वनस्पतिशास्त्र विभाग यांनी Blooms Taxonomy in Question Paper Setting या विषयावर १५ नोव्हेंबर २०२२ रोजी शिक्षकांकरता कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये प्रश्नपत्रिका तयार करताना Blooms Taxonomy चा कशा पद्धतीने वापर करता येईल याबाबत मार्गदर्शन केले.

संस्कृत विभागातर्फे १५ नोव्हेंबर २०२२ रोजी संस्कृत दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राध्यापक अदिती माधव, संस्कृत विभाग - वझे केळकर महाविद्यालय यांनी मार्गदर्शन केले.

### परिषद पूर्व कार्यशाळा

गणित विभाग आणि संख्याशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या परिषद पूर्व कार्यशाळेचे आयोजन २६ नोव्हेंबर २०२२ रोजी करण्यात आले होते. यामध्ये "How to Write a Research Paper in Mathematics" या विषयावर डॉ मनीषा आचार्य यांनी मार्गदर्शन केले.



## ग्रंथालय विभाग

ग्रंथालय विभागातर्फे विविध थोर व्यक्तींच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन भरवून साजरे करण्यात आले. सौ. कादंबरी मांजरेकर यांनी ११ नोव्हेंबर २०२२ रोजी मोलाना अब्दुल कलाम आझाद, १५ नोव्हेंबर २०२२ रोजी बिरसा मुंडा आणि १९ नोव्हेंबर २०२२ रोजी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ग्रंथालय विभागातर्फे २६ नोव्हेंबर २०२२ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. संविधान दिवशी वरील माहितीचे प्रदर्शन करण्यात आले.



## करियर मेळावा

अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन मार्गदर्शन करण्यासाठी २८ नोव्हेंबर २०२२ रोजी करियर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री राजेश गाडगीळ यांनी 'रियल इस्टेट' या विषयावर, निवृत्त एअर व्हाईस मार्शल सुनील नानोडकर यांनी 'करियर इन डिफेन्स' या विषयावर, श्री सुहास पाटील यांनी 'स्पर्धा परीक्षा', कॅप्टन चंद्रशेखर यांनी 'डिफेन्स सर्व्हिसेस' श्री सॅम्युएल यांनी 'मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह', तर महादेव जगताप यांनी 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा' याबाबत या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

४ नोव्हेंबर: ''भ्रष्टाचारमुक्त विकसित भारत राष्ट्रासाठी'' या विषयसूत्रासह, डॉ व्ही एन ब्रिम्स तर्फे दक्षता सप्ताह साजरा करण्यात आला. डॉ. स्मिता जपे यांनी ब्रिम्सचे सर्व विद्यार्थी, कर्मचारी आणि प्राध्यापकांना सचोटीची शपथ दिली.



५ नोव्हेंबर: प्रा. दिनेश सोनकुल यांनी यशस्वीरीत्या ''व्यवसायाच्या कामगिरीवर रिव्हर्स लॉजिस्टिकच्या प्रभावाचा अभ्यास'' या विषयात पीएच. डी. पदवी संपादन केली. याबद्दल त्यांचे अभिनंदन.






८ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

९ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी ए आय एम एस द्वारे आयोजित केलेल्या आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणासंबंधित असलेल्या ''उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण'' या विषयावरील ऑनलाइन चर्चासत्रात भाग घेतला.

प्रत्येकाकडे जीवन बदलण्याची वेळ असते, परंतु वेळ बदलण्यासाठी आपल्याला दोनदा जीवन मिळत नाही.




११ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी यांनी वडाळा येथील 'एसव्हीआयएम'च्या पीएच.डी. केंद्राला तपासणीसाठी भेट दिली.

११ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी २०२२-२४ तुकडीच्या एम एम एस पहिल्या सत्राच्या फाऊंडेशन प्रोग्राम्स दरम्यान ''न्यू आन्सेस फायनान्स'' या विषयावर एक सत्र आयोजित केले.




११ नोव्हेंबर : ब्रिम्सच्या रोजगार नियुक्ती विभागाचे डॉ. महेश भानुशाली, डॉ. मुग्धा भडकमकर, श्वेता नायर, आणि अमित नांबियार यांनी फाऊंडेशन प्रोग्राममध्ये २०२२-२४ तुकडीच्या प्रथम वर्ष एम एम एस च्या विद्यार्थ्यांसाठी माहिती सत्र घेतले.



१३ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी उद्योग अनुभव प्रतिष्ठानच्या उद्योजकता पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहिले.



१६ नोव्हेंबर : विद्यार्थी विकास समितीच्या विद्यार्थ्यांनी नवीन २०२२ वर्षाच्या विद्यार्थ्यांसह एक सत्र आयोजित केले, ज्यात त्यांना समितीची भूमिका आणि उपक्रम याबद्दल माहिती दिली.



१६ आणि १७ नोव्हेंबर : प्रा. विशाल नायर यांनी डॉ व्ही एन ब्रिम्स आणि वाधवानी फाऊंडेशन यांच्या सहकार्याने एम एम एस द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एन इ एन इग्नाइट (NEN-IGNITE) अभ्यासक्रमावर एक सत्र आयोजित केले.




१७ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी 'संशोधनाचे महत्त्व' या विषयावर फाऊंडेशन कार्यक्रमात एमएमएसच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना संबोधित केले.

जगातील प्रत्येकाकडे २४ तास असतात, ज्याला यशस्वी व्हायचे आहे ते योग्यरित्या वापरण्यास शिकतात.



१९ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी ''१० कि.मी. च्या नेव्ही रन'' मध्ये सहभागी झाले.




१९ नोव्हेंबर : विद्यार्थी विकास समिती तर्फे एम एम एस च्या विद्यार्थ्यांसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ६ संघ सहभागी झाले होते.

खालील संघाने स्पर्धेचे विजेते पद पटकावले :-

योगेश जोहरी, यश मोहिते, दर्शन, इंदर, आतिश, मोहन, वरुण बंजन, प्रणव साळवी



२१ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी यांची मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या पी.एच.डी. मुलाखत परीक्षेसाठी परीक्षक समिती अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

२२ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी, डॉ. तुंगुट तुरसे यांनी संपादित केलेल्या ''करंट आस्पेक्स्टस इन बिझनेस इकॉनॉमिक्स अँड फिनान्स'' या पुस्तकासाठी एक अध्याय लिहिला. हे पुस्तक बी पी इंटरनॅशनल तर्फे ISBN: 978-93-5547-957-0 सह प्रकाशित करण्यात आले आहे.




२४ नोव्हेंबर : ब्रिम्सच्या प्रवेश विभागाने १९८ प्रवेशांसह एम एम एस ची प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली.

२४ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे ''फोर'' इंटरनॅशनल फायनान्स या ऑनलाइन कॉन्फरन्स २०२२ मध्ये सहभागी झाल्या.



२६ नोव्हेंबर : ब्रिम्सच्या रोजगार नियुक्ती विभागाने प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या एम एम एस च्या विद्यार्थ्यांसाठी, एनएसई अकादमी आणि एचडीएफसी म्युच्युअल फंड यांच्या संयुक्त विद्यमाने एक सत्र आयोजित केले. यामध्ये ''इन्व्हेस्ट व्हर्स''- गुंतवणुकीच्या जगाचा परिचय या विद्यार्थ्यांसाठी लहान वयातच वित्तीय बाजार आणि वैयक्तिक आर्थिक जगामध्ये गुंतवणूक व्यवहार समजून घेण्यासाठी एक प्रशंसापर प्रमाणपत्र कार्यक्रमा संदर्भात माहिती देण्यात आली. सत्राचे सूत्रसंचालन श्वेता नायर यांनी केले.

नेहमी लक्षात ठेवा, आपल्याला खाली खेचणारे लोक नेहमी आपल्यापेक्षा खालच्या स्तरावर असतात!




२८ नोव्हेंबर : ब्रिम्सच्या रोजगार नियुक्ती विभागाने द्वितीय वर्ष एम एम एस च्या विद्यार्थ्यांसाठी जी मनी प्रा. ली. या कंपनीसाठी आभासी मुलाखती द्वारे नियुक्ती पूर्व बोलणीचे (प्री-प्लेसमेंट टॉकचे) आयोजन केले.







## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक ०५ नोव्हेंबर २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचा 'अमृत वर्षातील अभिष्टचिंतन समारंभ' महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी गुहागर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार डॉ. विनय नातू, विद्या प्रसारक मंडळाचे सचिव अभय मराठे, सौ. सुमेधा वहिनी बेडेकर, मंडळाचे पदाधिकारी आणि माजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे १८ सदस्य यांच्या उपस्थितीत हा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी मराठी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून 'नाट्य स्वर संध्या' हा कार्यक्रम अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि संचालिका यांनी सादर केला.



दिनांक ०५ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प सादरीकरण करण्यात आले. यावेळी माजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. बी.एस.व्ही.जी शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली सादरीकरण करण्यात आले. यावेळी एकूण तीन गटांनी त्यांच्या प्रकल्पाच्या कल्पना मांडल्या. श्री. बी.एस.व्ही.जी शर्मा आणि विभागातील प्राध्यापकांनी प्रकल्पाचे सर्व तपशील आणि विद्यार्थ्यांना प्रकल्प डिझाईन आणि अंमलबजावणीच्या सर्व पैलूंवर मार्गदर्शन केले.




दिनांक ०५ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी 'एलटी पॉवर सप्लाय प्रोटेक्शन थ्रू मिनिएचर सर्किट ब्रेकर्स' या विषयावर एक दिवसीय सेमिनार आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अधिव्याख्याते म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितेचे सदस्य श्री.बी.एस.व्ही.जी शर्मा हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी फ्यूजची मूलभूत माहिती आणि त्याचा वापर, एलटी सर्किट ब्रेकरवर फ्यूजचे फायदे, एलटी सर्किट ब्रेकरचे प्रकार एमसीबी जोडण्याची योग्य पद्धत आणि एसी आणि डीसी सिस्टीममधील आर्क क्वेंचिंग पद्धती इत्यादीं विषयी उपस्थितांना थोडक्यात माहिती दिली. या सेमिनार मध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सदर सेमिनारचे समन्वयक म्हणून प्रा. प्रीती साठे यांनी काम पाहिले.

भित्री माणसे मरण्यापूर्वी अनेकदा मरतात, पण शूर माणसे एकदाच जन्मतात आणि एकदाच मरतात.



दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी तसेच महाराष्ट्र पॉलिटेक्निक, एसएसओएसपी नागोठणे, जीपीआर रत्नागिरी, भोसले पॉलिटेक्निक, बाटू लोणेरे, बिचोलिम गोवा इत्यादी जवळपासच्या डिप्लोमा कॉलेजसाठी 'इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम, एचव्ही स्विचयार्ड आणि संबंधित दोषांवर प्रेरक चर्चा आणि परिसंवाद' या विषयावर यशस्वीरित्या परिसंवाद आयोजित केला गेला. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. शिरीष आगरकर हे या कार्यक्रमासाठी रिसोर्स पर्सन म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी आणि जवळपासचे डिप्लोमा कॉलेज मिळून १०१ विद्यार्थी या चर्चासत्रात सहभागी झाले होते. श्री. शिरीष आगरकर यांनी इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम स्विचयार्ड, विविध प्रकारचे दोष जसे की, - सिंगल फेजिंग, पॉवर रिव्हर्सल, ब्लॅक आऊट आणि IEEE आणि ISI इत्यादी विविध मानकांबद्दल थोडक्यात माहिती दिली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. प्रीती साठे यांनी काम पाहिले.



दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजी स्थापत्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. शेखर गजानन सावंत यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. सदर कार्यक्रम महाविद्यालयातील सिव्हील सेमिनार हॉल मध्ये पार पडला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे तत्कालीन संचालक डॉ. अमितकुमार माने, महाविद्यालयातील सर्वविभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवर व उपस्थितांचे स्वागत करून करण्यात आले. त्यानंतर प्रा. शेखर सावंत, डॉ. अमितकुमार माने व विभागप्रमुख यांनी दीप प्रज्वलन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. गीतांजली सावंत यांनी केले. प्रा.शेखर सावंत यांची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तथा महावितरण मध्ये सहाय्यक अभियंता या पदावर निवड झाल्याबद्दल तत्कालीन संचालक डॉ. अमितकुमार माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. अमितकुमार माने यांनी त्यांच्या मनोगतामध्ये शेखर सावंत यांची काम करण्याची पद्दत व त्यांचे या महाविद्यालयासाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभार मांडले. महाविद्यालयातील इतर शिक्षकांनी श्री. शेखर सावंत याच्याविषयी आलेले अनुभव व्यक्त केले.

प्रा.शेखर सावंत यांनी आपल्या मनोगतामध्ये संस्थेने दिलेल्या वेगवेगळ्या जबाबदारी व त्यातून मिळालेल्या अनुभवासाठी संस्थेचे आभार मानले व यापुढे आपण या महाविद्यालयाबरोबर संपर्कात राहू असे आश्र्वासन दिले. महाविद्यालयातील विविध विभागांनी व स्थापत्य विभागातील विद्यार्थ्यांनी प्रा.शेखर सावंत यांना विविध भेटवस्तू देऊन सन्मानित केले. तसेच स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने प्रा. शेखर सावंत यांच्या गेल्या सात वर्षातील संकलित केलेल्या छायाचित्रांच्या आठवणींचा संग्रह भेट दिला.




सुखापेक्षा दुःखामुळे होणारे ज्ञान श्रेष्ठ दर्जाचे असते.

दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या प्रसिद्धी टीमने ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. सुधाकर आगरकर व श्री.नरेंद्र गोळे यांच्या अतिथी व्याख्यानासंदर्भात परिसरातील दोन कनिष्ठ महाविद्यालयांना भेट दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्रा.सतीश घोरपडे आणि प्रा.राजेश परडे यांनी खरे-ढेरे ज्युनियर कॉलेज, गुहागर या महाविद्यालयास भेट दिली. प्राचार्य श्री. कोरके सर आणि टीमने विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी संभाव्य उपक्रम करितां सकारात्मकता दर्शविली. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्रा.योगेश काटदरे, प्रा. प्रीती साठे व प्रा.वैभवी मेथा यांचा समावेश असलेल्या दुसऱ्या टीमने कनिष्ठ महाविद्यालय, पाटपन्हाळे या महाविद्यालयास भेट दिली.



दिनांक १९ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे विशेष मार्गदर्शन शिबिर रत्नागिरी येथील जाकादेवी कनिष्ठ महाविद्यालयात पार पडले. या विशेष मार्गदर्शन शिबिराकरितां महाविद्यालयाच्या संचालिका डॉ.कीर्ती आगाशे, प्रा.केशव चौगुले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना बारावी सायन्स नंतर अभियांत्रिकीमध्ये करिअरच्या कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत, उच्च शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया कशी चालते, तसेच महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय वेळणेश्वर येथील विविध सुविधा, शिष्यवृत्ती याबाबत सविस्तर माहिती उपस्थित बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना देण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशालेचे मुख्याध्यापक बिपीन परकर, पर्यवेक्षक भूपाल शेंडगे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्री. संतोष पवार, तंत्रस्नेही मंदार रसाळ, तसेच शिवानंद गुरव, कलाध्यापक तुकाराम दरवजकर, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.



दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ रोजी वेळणेश्वर महाविद्यालयाच्या वतीने डी.बी.जे. महाविद्यालय या ठिकाणी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ.सुधाकर आगरकर आणि महाविद्यालयाचे प्रा.योगेश काटदरे हे उपस्थित होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ. सुधाकर आगरकर यांचे 'काचेचे अद्भुत जग' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात एकूण ३०० विद्यार्थी उपस्थित होते. सत्रानंतर अर्धा तास प्रश्नोत्तर सत्र झाले. त्यामध्ये प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने अनेक प्रश्न विचारले आणि डॉ. सुधाकर आगरकर यांनी त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले.



दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ रोजी चिंचघर कनिष्ठ महाविद्यालय, चिपळूण यांच्या वतीने वेळणेश्वर महाविद्यालयातील तज्ज्ञांचे या ठिकाणी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. नरेंद्र गोळे, महाविद्यालयाचे प्रा. सतीश घोरपडे व प्रा. केतन कुंडिया यांनी सती चिंचघर कनिष्ठ महाविद्यालयाला भेट दिली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे

सदस्य श्री. नरेंद्र गोळे यांचे 'वातावरण' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात सुमारे २५० विद्यार्थी उपस्थित होते. सत्र संवादात्मक आणि क्रियाकलापावर आधारित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध प्रयोगांचा आनंद लुटला.



दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने संविधान दिनाचे औचित्य साधून वेबिनारचे आयोजन केले होते. त्यानंतर संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून श्री.प्रकाश नाईक यांनी संविधान व त्या पाठीमागचा इतिहास यावर कटाक्ष टाकला. सदर कार्यक्रमामध्ये एकूण शंभरहून अधिक विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.



दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या दोन टीमने गेस्ट लेक्चर्स आणि महाविद्यालयाच्या प्रमोशनसाठी दोन कॉलेजिसना भेट दिली. यामध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ. सुधाकर आगरकर व महाविद्यालयाचे प्रा.केशव चौगुले यांनी कनिष्ठ महाविद्यालय गुहागरला भेट दिली. यावेळी डॉ.सुधाकर आगरकर यांचे 'काचेचे अद्भुत जग' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात बारावी सायन्सचे एकूण ७५ विद्यार्थी उपस्थित होते. सत्रानंतर अर्धा तास प्रश्नोत्तर सत्र झाले, ज्यामध्ये प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने अनेक प्रश्न विचारले आणि डॉ. सुधाकर आगरकर यांनी त्यांच्या सर्व शंकांचे निरसन केले.

त्याचप्रमाणे ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री.नरेंद्र गोळे व महाविद्यालयाचे प्रा.गजानन खापरे यांनी श्रीमती.आर.पी.पी.पालशेतकर कनिष्ठ महाविद्यालय पालशेत येथे मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री.नरेंद्र गोळे यांचे 'वातावरण' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात एकूण ६० विद्यार्थी उपस्थित होते. सत्र संवादात्मक आणि क्रियाकलापावर आधारित होते.



दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या एका टीमने गेस्ट लेक्चर्स आणि महाविद्यालयाच्या प्रमोशनसाठी ज्युनियर कॉलेज - सावर्डे याठिकाणी भेट दिली. यामध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ. सुधाकर आगरकर व महाविद्यालयाच्या संचालिका डॉ.कीर्ती आगाशे व प्रा.भक्ती घोरपडे यांचा सहभाग होता. डॉ.सुधाकर आगरकर यांचे 'काचेचे रहस्यमय जग' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात एकूण १६० विद्यार्थी उपस्थित होते.



दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या एका टीमने गेस्ट लेक्चर्स आणि महाविद्यालयाच्या प्रमोशनसाठी कनिष्ठ महाविद्यालय खंडाळा याठिकाणी भेट दिली. यामध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री नरेंद्र गोळे, महाविद्यालयाचे प्रा.योगेश काटदरे, प्रा.वैभवी मेथा यांचा समावेश होता. ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य श्री. नरेंद्र गोळे यांचे 'वातावरण' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात एकूण ८० विद्यार्थी उपस्थित होते. सत्र संवादात्मक आणि क्रियाकलापावर आधारित होते.



दिनांक २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या एका टीमने गेस्ट लेक्चर्स आणि महाविद्यालयाच्या प्रमोशनसाठी आर.सी.काळे कनिष्ठ महाविद्यालय, पेढे- परशुराम चिपळूण याठिकाणी भेट दिली. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ. सुधाकर आगरकर, श्री.नरेंद्र गोळे व महाविद्यालयाचे प्रा.केतन कुंडिया आणि प्रा.जितेंद्र आचार्य हे उपस्थित होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ समितीचे सदस्य डॉ. सुधाकर आगरकर यांचे 'काचेचे रहस्यमय जग' या विषयावर, तसेच श्री. नरेंद्र गोळे यांचे 'वातावरण' या विषयावर व्याख्यान झाले. या सत्रात एकूण १२० विद्यार्थी उपस्थित होते.



दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील महिला विकास सेल आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सक्षमीकरण' कार्यक्रम हाती घेण्यात आला. या निमित्ताने ग्रामीण भागातील महिलांसाठी 'डिजिटल जगाचा परिचय' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींनी उपस्थितांना स्मार्ट फोनचा मूलभूत वापर, विविध ॲप्स आणि ते कसे इन्स्टॉल करायचे आणि त्याची मूलभूत वैशिष्ट्ये समजावून सांगितली. यावेळी सहभागी महिलांनी स्मार्ट फोन कसे हाताळायचे याबाबत प्रात्यक्षिकासह अनुभव घेतले. या कार्यशाळेत सुमारे तीस महिलांनी सहभाग नोंदवला.



## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**- संपादक**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.